# नवीन जीवनशैली

## ख्रिस्ताचा स्वीकार करणे म्हणजे काय हे समजून घेणे



जॉयस मेयर

न्यू यॉर्क टाइम्स ची सर्वाधिक विकल्या जाणाऱ्या पुस्तकाची लेखिका

# नवीन
# जीवनशैली

# नवीन जीवनशैली

## ख्रिस्ताचा स्वीकार करणे म्हणजे काय हे समजून घेणे

## जॉयस मेयर

JOYCE MEYER MINISTRIES®

Plot No. 512/B, Road No. 30, Jubilee Hills, Hyderabad - 500 033

If you purchase this book without a cover you should be aware that this book may have been stolen property and reported as "unsold and destroyed" to the publisher. In such case neither the author nor the publisher has received any payment for this "stripped book."

Unless otherwise indicated, all Scripture quotations are taken from THE AMPLIFIED BIBLE: Old Testament. Copyright © 1962, 1964 by Zondervan Publishing House (used by permission); THE KING JAMES VERSION; and from THE AMPLIFIED NEW TESTAMENT. Copyright© 1958 by the Lockman Foundation (used by permission).

The author would like to acknowledge that the story used in chapter 3, on pages 11-13 is on original sermon illustration by Dr. Monroe Parker and is used by permission of Gospel Projects Press, P.O. Box 643, Milton, FL 32572: copyright 1977. www.childrensbibleclub.com

Copyright © 2015 by Joyce Meyer Ministries - Asia

All rights reserved. No part of this publication may be reproduced, distributed, or transmitted in any form or by any means, or stored in a database or retrieval system, without the prior written permission of Joyce Meyer Ministries - Asia.

Joyce Meyer Ministries - Asia
Plot No. 512/B, Road No. 30,
Jubilee Hills, Hyderabad - 500 033

Phone: +91-40-2300 6777
Website: www.jmmindia.org

A New Way of Living - *Marathi (R1 - 2015)*
*Understanding What It Means to Accept Christ*

*Printed at:*
Caxton Offset Pvt. Ltd.
Hyderabad - 500 004

# अनुक्रमणिका


1. तुम्ही घेणार असलेला सर्वांत महत्त्वाचा निर्णय 1
2. आपण सर्वांनी पाप केले आहे 5
3. ही शरण जाण्याची वेळ आहे 11
4. नवीन जीवनशैली 17
5. नवीन विचारसरणी 26
6. बोलण्याची नवीन पद्धत 33
7. स्वतःकडे पाहण्याचा नवीन दृष्टीकोन 38
8. भीतीऐवजी विश्वास बाळगा 44
9. जीवनाचा आनंद घ्या 48

तारणासाठी प्रार्थना 52

अधिक अभ्यासासाठी 53

तारणाची प्रार्थना 54

# *प्रकरण 1*

# तुम्ही घेणार असलेला सर्वांत महत्त्वाचा निर्णय

तुमच्या जीवनाबाबत तुम्ही असंतुष्ट आहात का? तसे असेल तर असमाधानी असणारे तुम्ही एकटेच नाही, पुष्कळ लोक थकलेभागलेले, अंतःकरणात रिकामेपण भरून राहिलेले, असंतुष्ट, अतृप्त असे आहेत. या भावनेवर उपाय म्हणून काहीजणांनी धर्माचा उपयोग करून पाहिला, पण त्यामुळे ते निर्जीव, अतार्किक नियमांच्या जंजाळात अडकले होते. तुम्ही धर्माचा उपयोग करून पाहिला असेल, तर तुमच्या पोकळ, निराश, पापदोषाने दबलेल्या जीवनात देवाचा उपयोग करून पाहिला असेल असा याचा अर्थ होत नाही.

लोकांनी आपल्याला आपुलकी दाखवावी, प्रीती करावी असे वाटत असेल, तुम्हांला मित्र हवा असेल, तुमच्या पापांची क्षमा व्हावी असे तुम्हांला वाटत असेल, आणि तुम्हांला जर भवितव्य असेल तर... येशू ख्रिस्त हे तुमचे उत्तर आहे. तुम्हांला नवीन जीवन द्यावे आणि तुम्हांला नवी कोरी व्यक्ती बनवावे म्हणून तो वाट पाहत आहे.

तुम्ही तुमच्या जीवनाबाबत समाधानी नसाल, तर तुम्ही काहीतरी बदललेच पाहिजे. आपण आतापर्यंत ज्या गोष्टी केल्या त्याच जर करीत

राहिलो, तर आपले जीवन पूर्वीप्रमाणेच राहील. तुम्हांला एक निर्णय घेण्याची गरज आहे, आणि तुम्ही घेणार असलेला हा सर्वांत महत्त्वाचा निर्णय आहे.

तुमच्या करियरसंबंधी, कॉलेजला जायचे की नाही, लग्न करायचे की नाही, तुमच्या पैशांचा विनियोग कसा करावा, किंवा कोठे राहायचे यासंबंधी तुम्ही जे निर्णय घ्याल त्यापेक्षा हा निर्णय अधिक महत्त्वाचा आहे. हा निर्णय सार्वकालिक जीवनासंबंधी आहे. सार्वकालिक जीवन म्हणजे शेवट नसलेले जीवन, आणि हे जीवन आपण कोठे व्यतित करणार आहोत हे आपणा प्रत्येकाने जाणून घेण्याची गरज आहे. मरणानंतर जीवन आहे. तुम्ही मरण पावता तेव्हा तुमचे अस्तित्व संपत नाही, तर दुसऱ्या ठिकाणी ते सुरू होते. असे म्हटले जाते की, मरणे म्हणजे फिरत्या दारातून आत जाणे. तुम्ही एक ठिकाण सोडून दुसऱ्या जागी जाता.

या पृथ्वीवर तुम्हांला देवासोबत नातेसंबंध हवे आहेत का? आणि त्याच्यासोबत सार्वकालिक जीवन जगायचे आहे का? जर असेल, तर तुम्ही येशू ख्रिस्ताला आपला वैयक्तिक तारणारा म्हणून स्वीकारले पाहिजे. आपण सर्वांनी पाप केले आहे आणि आपणा सर्वांना तारकाची गरज आहे. देवाने त्याच्या एकुलत्या एका पुत्राला आमच्या पापाचा दंड भरण्यासाठी पाठवले. त्याला वधस्तंभावर खिळण्यात आले आणि आमच्या पापांची किंमत म्हणून त्याने त्याचे निष्कलंक रक्त तेथे सांडले. तो मेला आणि त्याला पुरले गेले, पण तिसऱ्या दिवशी तो मरणातून पुन्हा उठला आणि आता स्वर्गात देवपित्याच्या उजवीकडे बसला आहे. तुम्हांला शांती, आनंद मिळावा आणि देवासमोर उभे राहता यावे म्हणून केवळ तोच तुमची आशा आहे.

आपल्याला पापांची क्षमा हवी असेल तर आपण येशू ख्रिस्ताला आपला प्रभू म्हणून स्वीकारले पाहिजे, आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठवले असा आपल्या अंतःकरणात विश्वास बाळगला पाहिजे.

> येशू प्रभू आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करिशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल.
>
> – रोम.10:9

या प्रकारचा विश्वास हा बौद्धिक मान्यतेपेक्षा अधिक आहे. तो प्रामाणिक आणि मनापासून आहे. देव आहे असा पुष्कळ लोकांचा विश्वास आहे, पण त्यांनी त्यांची जीवने देवाला समर्पित केलेली नाहीत. देव जीवनाचा निर्माता आहे, आणि आपण स्वखुषीने आणि आनंदाने ते त्याला परत द्यावे अशी त्याची इच्छा आहे. देवाने तुम्हांला मुक्त इच्छा दिली आहे, आणि तुम्ही त्याला निवडावे म्हणून तो तुमच्यावर बळजबरी करणार नाही. पण तुम्ही तसे केले किंवा केले नाही, तर या पृथ्वीवरील तुमच्या जीवनाच्या गुणवत्तेत फरक पडेल, तसेच तुम्ही मेल्यावर तुमचे सार्वकालिक जीवन तुम्ही कोठे घालवणार हे निश्चित करणारा हा घटक आहे.

तुम्ही तुमचे जीवन यशस्वीपणे घालवले आहे का? जर नसेल, तर ज्याने तुम्हांला निर्माण केले आणि तुमच्या स्वतःपेक्षा जो तुम्हांला अधिक चांगल्या प्रकारे ओळखतो त्याच्या हाती तुम्ही ते का सुपूर्द करीत नाही? समजा मी एखादी मोटारगाडी विकत घेतली आणि ती मला त्रास देऊ लागली तर मी ती कंपनीत परत घेऊन जाईन म्हणजे ते ती दुरुस्त करतील. देवाच्या बाबतीतही हेच तत्त्व आहे. त्याने तुम्हांला निर्माण केले, आणि तो तुमच्यावर खूप प्रीती करतो. जर तुमचे जीवन तुम्हांला समाधान देत नसेल तर ते त्याच्याकडे घेऊन जा म्हणजे तो ते दुरुस्त करील.

जोपर्यंत तुम्ही निर्णय घेत नाही, तोपर्यंत काहीही बदलणार नाही हे मी तुम्हांला याअगोदर सांगितलेच आहे. तुम्हांला विश्वासणारे (ख्रिस्ती) व्हायचे आहे का? फक्त तुमची पापेच नव्हे, तर तुम्हांला स्वतःला देवाच्या हाती सोपवून द्यायला तुम्ही तयार आहात का? तुमचे पापी मार्ग सोडून द्यायला आणि देवासह आणि देवासाठी नवे कोरे जीवन कसे जगावे हे शिकायला तुम्ही तयार आहात का? जर असाल तर हे पुस्तक पुढे वाचा, कारण तुम्ही कल्पनाही करू शकणार नाही असे सर्वोत्कृष्ट जीवन तुमच्यासाठी वाट पाहत आहे. ते सर्वांसाठी उपलब्ध आहे. कोणाचाही त्याला अपवाद नाही. देव तुमच्या भविष्याविषयी असे म्हणतोः

> परमेश्वर म्हणतो, तुम्हांविषयी माझ्या मनात जे संकल्प आहेत ते मी जाणतो; ते संकल्प हिताचे आहेत, अनिष्टाचे नाहीत; ते तुम्हांस तुमच्या भावी सुस्थितीची आशा देणारे आहेत – यिर्मया 29:11

तुमच्यासाठी दुसरे कोणी निवड करू शकणार नाही. केवळ तुम्ही आणि तुम्हीच तो निर्णय घ्यायचा आहे. तुम्हांला कसल्या प्रकारचे जीवन हवे आहे? आज आपल्या समाजात जे चित्र, जे उदाहरण तुम्हांला दिसते त्याचे तुम्हांला अनुसरण करायचे आहे का? देवाचे वचन म्हणते की, आपण या जगात काही घेऊन आलो नाही आणि काही घेऊन जाणार नाही (1 तीमथ्य. 6:7). देव अल्फा आणि ओमेगा, आरंभ आणि शेवट आहे. प्रारंभी देव होता आणि अखेरीस देव असेल. प्रत्येक मनुष्य देवासमोर उभे राहून आपल्या जीवनाचा हिशेब त्याला देईल (रोम.14:12). त्यासाठी तयार होण्याची हीच वेळ आहे. मी नेहमीच म्हणते, “तुम्ही तयार असा किंवा नसा, पण येशू येणार आहे.” आताच तयार व्हा, आताच योग्य निर्णय घ्या; कारण नंतर फार उशीर झालेला असेल.

## *प्रकरण 2*

# आपण सर्वांनी पाप केले आहे

पाप म्हणजे आपल्याला माहीत असलेली देवाची इच्छा, देवाची आज्ञा जाणूनबुजून मोडणे. आपण सर्वांनी पाप केले आहे. ज्याने पाप केले नाही असा एकही मनुष्य पृथ्वीवर नाही (रोम. 3:23; उपदेशक 7:20). ही वाईट बातमी आहे, पण आपल्यासाठी चांगली बातमीदेखील उपलब्ध आहे. आपणा सर्वांना पापक्षमा मिळू शकते आणि देवासोबत आपला समेट घडवून आणला जाऊ शकतो.

> कारण सर्वांनी पाप केले आहे, आणि ते देवाच्या गौरवाला उणे पडले आहेत; देवाच्या कृपेने ख्रिस्त येशूने खंडणी भरून प्राप्त केलेल्या मुक्तीच्या द्वारे ते विनामूल्य नीतिमान ठरतात.
>
> — रोम. 3:23-24

देवाने तुमच्या पापाची किंमत अगोदरच भरलेली आहे; आता तुम्ही केवळ त्यावर विश्वास ठेवून स्वीकार करायचा आहे. तुम्ही तुमची पापे पदरी घेतली, त्यांच्याविषयी तुम्हांला वाईट वाटले आणि ती पूर्णपणे सोडून देण्यास तुम्ही तयार असाल तर देव तुम्हांला क्षमा करील आणि नवीन व्यक्ती करील.

> जर आपण आपली पापे पदरी घेतली, तर तो विश्वसनीय व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील व आपल्याला सर्व अनीतीपासून शुद्ध करील.
>
> – 1 योहान. 1:9

देवाने काहीतरी करावे म्हणून तुम्ही वाट पाहत बसण्याची गरज नाही. जे काही करायला पाहिजे ते त्याने अगोदरच केले आहे. त्याने त्याच्या एकुलत्या एक पुत्राला आमच्या ऐवजी मरण्यास पाठवले, कारण केवळ परिपूर्ण आणि निष्कलंक अर्पणचे आमच्या दुष्कृत्यांची किंमत म्हणून भरले जाऊ शकते. न्यायाचे समाधान झाले आहे, आणि येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवण्याद्वारे व त्याच्याद्वारे देवाशी घनिष्ट नातेसंबंध प्रस्थापित करण्याद्वारे आपण पापमुक्त जीवन जगू शकतो. आपल्या स्वतःच्या प्रयत्नांनी आपण देवाकडे जाऊ शकत नाही, आपल्याला वकिलाची, मध्यस्थाची गरज आहे. दोघांमध्ये समन्वय साधणारा कोणीतरी आपल्याला हवा आहे आणि हा कोणीतरी येशू ख्रिस्त आहे. देव आणि आपण यांच्यामध्ये असलेली दरी येशूने भरून काढली. आपल्या पापांमुळे ही दरी निर्माण झाली होती. ही दरी भरून येशू आपल्याला देवाकडे आणतो.

जसा पिता बालकामध्ये असतो (त्याचे रक्त, त्याचा डीएनए, क्रोमोजोम्स इ.) तसा देव ख्रिस्तामध्ये होता आणि त्याच्याद्वारे तो जगाचा समेट स्वतःशी करून घेत होता. स्वतः निर्माण केलेल्या लोकांवर देव प्रीती करतो, त्यांना पापाच्या गुलामगिरीत विकले गेलेले पाहण्याची त्याला इच्छा नाही, म्हणून त्याने त्यांच्यासाठी मार्ग तयार केला. येशू हाच तो मार्ग आहे!

# पापामुळे शाप येतो

देवाचे वचन सांगते की आमचे पाप आम्हांला भोवेल (गणना 32:23) पापामुळे शाप येतो तर आज्ञापालनामुळे आशीर्वाद मिळतात (अनुवाद 28). पाप करूनही एखाद्या व्यक्तीचे सर्व काही सुरळीत चालू असल्याचे काही काळ भासते. दुसऱ्या कोणाहीप्रमाणेच त्यांचे जीवन सुखी, चांगले वाटते, पण त्यांनी केलेल्या निवडींचे परिणाम अखेरीस त्यांना भोगावेच लागतील.

देवाचे आज्ञापालन करण्याची निवड करण्याऐवजी आपण पापी जीवनाची निवड करतो तेव्हा आपल्या आत्म्यात आपल्याला यातना, दुःखाचा अनुभव येतो. मांस आणि रक्त यांनी बनलेल्या शरीरापेक्षा मनुष्य अधिक काही आहे. तो आत्मा आहे आणि त्याला जीव आहे. हा जीव मन, इच्छा आणि भावना यांनी बनलेला आहे. तो माणसाचे व्यक्तीत्व आहे. पापी लोकांना मनात शांती नसते. ते मानसिक तणावाने भरलेले असतात, आणि त्यांनी काहीही केले किंवा मिळवले तरी त्यांचे पूर्ण समाधान कशानेही होत नाही. त्यांना भावनिक त्रास होतात. आपल्या जीवनाचे सुकाणू स्वतःच्याच हातात ठेवण्याचे त्यांनी ठरवलेले असल्यामुळे गोष्टी त्यांच्या मनाप्रमाणे घडत नाहीत तेव्हा ते निराश आणि क्रोधाविष्ट (भावनिकरित्या अस्वस्थ) होतात. विश्वासाच्या मार्गाची त्यांना काहीएक कल्पना नसते. देवावर विश्वास ठेवणे हे त्यांच्या स्वतःपेक्षा फार मोठे सामर्थ्य आहे, हे त्यांच्या आकलनशक्तीपलीकडचे आहे. त्यांच्या आत्म्यात त्यांना कधीही विसावा नसतो, कारण केवळ देवावर विश्वास ठेवल्यामुळेच मनुष्य देवाच्या विसाव्यात प्रवेश करू शकतो (इब्री.4:3).

होय, पापी जीवन हे शापांनी भरलेले जीवन आहे. त्यातून काहीही

चांगले निघत नाही. देवाशिवाय जगण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांच्या बाबतीत काय घडते त्याविषयी तो (देव) पुढीलप्रमाणे म्हणतो:

> मी माणसांवर संकट आणीन, ते अंधळ्यासारखे चालतील, कारण त्यांनी परमेश्वराविरुद्ध पाप केले आहे; त्यांचे रक्त धुळीसारखे व त्यांचे मांस विष्ठेसारखे फेकितील.
>
> परमेश्वराच्या क्रोधदिवशी त्यांच्या सोन्यारुप्याने त्यांचा बचाव होणार नाही; त्याच्या ईर्ष्येच्या अग्नीने सर्व देश भस्म होईल, कारण तो देशांतील सर्व रहिवाश्यांचा अंत करील आणि तोहि एकाएकी करील.
>
> — सफन्या 1:17-18

ही भीतीदायक शास्त्रवचने आहेत, पण येशू ख्रिस्तावर प्रामाणिकपणे विश्वास ठेवणाऱ्यांच्या मनात ती भीती उत्पन्न करीत नाहीत. जे येशूवर विश्वास ठेवतात त्यांचा कधीही न्यायनिवाडा होणार नाही (योहान. 3:18).

## पापदोष आणि शिक्षेस पात्र

पापदोष किंवा अपराधीपणाची जाणीव पाप्याचा सतत पिच्छा पुरवीत असते. त्याकडे दुर्लक्ष करण्यासाठी त्याने निरनिराळ्या गोष्टी केल्या तरी आपण चुकतो आहोत याची त्याला खोलवर जाणीव असते. येशूने म्हटले की पापी लोक पापदोषापासून सुटका करून घेण्यास असमर्थ असतात (योहान. 9:41).

पवित्र शास्त्राची जुना करार आणि नवीन करार अशा दोन भागांत विभागणी केलेली आहे. जुना करार हा “जुना” आहे. येशूने येऊन नवीन

करार प्रस्थापित करीपर्यंत, लोकांची पापे झाकण्यासाठी देव ज्या कराराचा उपयोग करीत होता, त्या जुन्या कराराचे तो प्रतिनिधित्व करतो. पापांसाठी अर्पणे करण्याच्या पद्धतीचे अनुसरण करण्याद्वारे लोकांची पापे झाकली जात, पण कधीही काढून टाकली जात नसत. दोषभावना त्यांच्या मनात सतत असे. पण, नवीन करारात आपल्याला परिपूर्ण आणि अंतिम अर्पण मिळाले आहे. ते पाप झाकत नाही, तर पूर्णपणे काढून टाकते. ते केवळ पापच धुऊन टाकते असे नाही, तर त्यासोबत दोषभावनाही काढून टाकते.

कृपया पुढील शास्त्रवचने सावकाश वाचा आणि ती जे काही सांगत आहेत त्यातील सामर्थ्यावर विचार करा. ही सर्व वचने इब्री. 10 मधून घेतली आहेत.

> त्या इच्छेने आपण येशू ख्रिस्ताच्या एकदाच झालेल्या देहार्पणाद्वारे पवित्र केलेले आहो. – इब्री. 10:10

> परंतु पापांबद्दल सार्वकालिक असा एकच यज्ञ अर्पून हा देवाच्या उजवीकडे बसला आहे. – इब्री. 10:12

> परमेश्वर म्हणतो, त्या दिवसांनंतर जो करार मी त्यांच्याबरोबर करीन तो हा : मी आपले नियम त्यांच्या मनात घालीन, आणि ते त्यांच्या हृदयपटावर लिहीन.
>
> आणि त्यांची पापे व त्यांचे स्वैराचार मी ह्यापुढे आठवणारच नाही. – इब्री. 10:16-17

> म्हणून आपली हृदये सिंचित झाल्याने दुष्ट भावनेपासून मुक्त झालेले

व निर्मळ पाण्याने शरीर धुतलेले असे आपण खऱ्या अंतःकरणाने
व विश्वासाच्या पूर्ण खातरीने जवळ येऊ. – इब्री. 10:22

ही वचने आपल्याला पुष्कळ महत्त्वाच्या आणि सुंदर गोष्टी सांगतात. पहिली गोष्ट म्हणजे, येशू एकदाच सर्वकाळासाठी अर्पण झाला आहे. आता त्यामध्ये दुसऱ्या अर्पणाची भर घालण्याची काहीही गरज नाही. जुन्या करारात, अर्पणे पुनःपुन्हा करावी लागत, तरीदेखील ती कधीही पापदोष काढून टाकत नसत. येशू हा सर्वकाळासाठी एकदाच अर्पण झाला, आणि तो पाप आणि पापदोष काढून टाकतो.

कायदेशीररित्या पापदोष जरी काढून टाकला असला, तरी या दोषी भावनेपासून मुक्त जीवन कसे जगावे हे शिकण्याची गरज असते. वास्तविक पाहता, ख्रिस्तासाठी नवीन जीवन जगण्यामध्ये, भावनांवर विजयी होण्यास शिकण्याची गरज आहे. ते आता भावनांना त्यांच्यावर नियंत्रण ठेवू देऊ शकत नाहीत. त्यांनी देवाचे वचन शिकले पाहिजे आणि त्याचे अनुसरण केले पाहिजे. आज्ञापालनाच्या या जीवनशैलीमुळे तुलना करता येणार नाहीत असे आशीर्वाद मिळतात.

*प्रकरण 3*

# ही शरण जाण्याची वेळ आहे

एक तर तुम्ही ख्रिस्ताचा अगोदरच स्वीकार केलेला आहे आणि येशू ख्रिस्ताबरोबरचे नवीन जीवन जगण्यासाठी मदत व्हावी म्हणून तुम्ही या पुस्तकाची मागणी केली आहे, किंवा तुम्ही तो निर्णय आता घ्यावा या आशेने तुम्हांला हे पुस्तक कोणीतरी दिलेले आहे.

योहान. 3:16 म्हणते, "देवाने जगावर एवढी प्रीती केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, यासाठी की जो कोणी त्याजवर विश्वास ठेवितो त्याचा नाश होऊ नये, तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे."

या वचनाचे सामर्थ्य समजण्यास तुम्हांला मदत व्हावी म्हणून एक गोष्ट मी तुम्हांला सांगते.

एका थंड, अंधाऱ्या रात्री शिकागो शहरात हिमवादळ सुरू झाले होते. रस्त्याच्या कोपऱ्यावर एक लहान मुलगा वर्तमानपत्रे विकत होता. गारठ्यामुळे लोक घरांतून बाहेर पडत नव्हते, आणि हा लहान मुलगा इतका गारठला होता की, तो खऱ्या अर्थाने खूप पेपर विकायचा प्रयत्नच करीत नव्हता. एका पोलिसाकडे जाऊन त्याने विचारले, "महाशय, एका गरीब मुलाला आजच्या रात्रीपुरता उबदार निवारा कुठे मिळेल हे तुम्हांला माहीत आहे का? गल्लीच्या तोंडाशी असलेल्या त्या मोठ्या खोक्यात मी

झोपत असतो, पण आज फारच थंडी आहे. झोपण्यापुरती एखादी उबदार जागा मिळाली तर फार बरे होईल."

पोलीसाने मुलाकडे पाहून म्हटले, "या रस्त्यावर थोडे पुढे एक पांढरे घर आहे, तेथे जा आणि दार ठोठाव. त्यांनी दार उघडल्यावर योहान. 3:16 म्हण म्हणजे ते तुला आत घेतील."

मुलाने तसे केले. पायऱ्या चढून तो दाराजवळ गेला आणि दार ठोकले. एका महिलेने दार उघडले. त्याने तिच्याकडे पाहून योहान. 3:16 म्हटले.

तिने म्हटले, "आत ये."

तिने त्याला घरात घेतले. उबदार शेकोटीजवळ झुलत्या खुर्चीत त्याला बसवून ती आत गेली. तेथे बसून मुलगा स्वतःशीच विचार करू लागला, *योहान. 3:16 ही काय भानगड आहे हे काही माहीत नाही, पण गारठलेल्या मुलाला त्यामुळे उब मिळते.*

थोड्या वेळाने त्या स्त्रीने त्याला विचारले, "तुला भूक लागली आहे का?"

तो म्हणाला, "थोडीशी, गेल्या दोन दिवसांत मी काहीही खाल्ले नाही, त्यामुळे थोडेफार अन्न मी खाऊ शकेन असे मला वाटते." तिने त्याला स्वयपाकघरात आणले आणि डायनिंग टेबलवर बसवले. टेबलावर सुंदर खाद्यपदार्थ ठेवले होते. मन भरेपर्यंत तो जेवला. पुन्हा त्याने मनाशी विचार केला, *योहान. 3:16 ची भानगड मला काही समजत नाही, पण ती भुकेल्या मुलाला तृप्त करते.*

त्या बाईने त्याला वरच्या मजल्यावर बाथरूममध्ये नेले. तेथे गरम पाण्याने भरलेला मोठा बाथटब होता. त्यात तो आरामात बसला. टबमध्ये

डुंबता डुंबता त्याने मनाशी विचार केला, *योहान. 3:16 – मला समजत नाही खरे, पण ते घाणेरड्या मुलाला स्वच्छ करते.* नंतर त्या महिलेने त्याला झोपण्याच्या खोलीत नेले. सुंदर उबदार बिछान्यावर त्याला झोपवले, त्याच्या अंगावर मऊ उबदार पांघरूण घातले, मानेखाली उशी दिली आणि गुडनाईट म्हणत त्याचा पापा घेतला. मग तिने दिवे बंद केले. बिछान्यावर पडल्या पडल्या बाहेर खिडकीत पाहिले. थंडगार बोचऱ्या रात्रीत बर्फ पडत होता. त्याने स्वतःशी विचार केला, *योहान. 3:16 हा काय प्रकार आहे जरी मला माहीत नसले तरी थकल्याभागलेल्या मुलाला त्यामुळे विसावा मिळतो.*

दुसऱ्या दिवशी सकाळी त्या स्त्रीने त्याला पुन्हा जेवणाच्या टेबलाकडे नेले. टेबलावर भरपूर अन्नपदार्थ होते. त्याने पोटभर खाल्ल्यावर तिने त्याला उबदार शेकोटीकडे नेऊन खुर्चीत बसवले. मग पवित्र शास्त्र घेऊन तीही त्याच्याजवळ बसली. तिने म्हटले, “योहान. 3:16 तुला समजते का?” त्याने उत्तर दिले, “नाही बाईसाहेब, काल रात्री पोलिसाने मला सांगितले तेव्हा मी पहिल्यांदाच हे शब्द ऐकले.” तिने पवित्र शास्त्र उघडून योहान. 3:16 हे वचन काढले आणि त्याला येशूविषयी सांगू लागली. त्याच ठिकाणी त्याने त्याचे जीवन येशूला दिले. तेथे बसून तो विचार करू लागला, *योहान. 3:16 – मला ते समजत नाही, पण ते हरवलेल्या मुलाला सुरक्षित करते हे मात्र नक्की.* (लेखक अज्ञात).

तुमच्या पापांची मान्यताप्राप्त अशी एकमेव किंमत म्हणून देवाचा पुत्र येशू ख्रिस्त याचा स्वीकार करून देवाला तुमचे जीवन समर्पित करण्यास तुम्ही आता तयार आहात का? माझ्यासोबत पुढील प्रार्थना म्हणण्यास मी तुम्हांला उत्तेजन देते. शब्द मोठ्याने म्हणा आणि ऐका म्हणजे तुमच्यासाठी व्यक्तिशः ते अर्थपूर्ण होतील.

*देवपित्या, मी तुझ्यावर प्रीती करतो. माझ्या पापांची क्षमा कर अशी विनंती करीत मी आज तुझ्याकडे येतो. येशू मी तुझ्यावर विश्वास ठेवतो, तू वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पावलास असा विश्वास मी धरतो, तुझे निष्पाप रक्त तू माझ्यासाठी सांडलेस, तू माझी जागा घेतलीस आणि माझी सर्व शिक्षा स्वतःवर घेतलीस. तू मेला, पुरला गेलास, आणि तिसऱ्या दिवशी तू मेलेल्यांतून पुन्हा उठला यावर माझा विश्वास आहे. मृत्यू तुला ताब्यात ठेवू शकला नाही. तू सैतानावर विजय मिळवलास आणि मृत्यूच्या व नरकाच्या किल्ल्या त्याच्यापासून हिसकावून घेतल्यास. हे सर्व तू माझ्यासाठी केलेस, कारण तुझी माझ्यावर प्रीती आहे असा विश्वास मी बाळगतो. जीवनभर मला तुझी सेवा करायची आहे. ज्या नवीन जीवनाचे अभिवचन तू मला दिले आहेस, ते जीवन कसे जगावे हे मला शिकायचे आहे. येशू, मी आता तुझा स्वीकार करतो आणि मला स्वतःला तुझ्या हाती सोपवून देतो. मी जसा आहे तसा माझा स्वीकार कर, आणि मी जे व्हावे असे तुला वाटते तसे मला बनव.*

*माझे तारण केल्याबद्दल, येशू मी तुझे आभार मानतो. तुझ्या पवित्र आत्म्याने मला भर, आणि मला जे जे शिकण्याची गरज आहे ते सर्व तू मला शिकव. माझे तारण झाले आहे, माझा नवीन जन्म झाला आहे, आणि मेल्यानंतर मी स्वर्गात जाईन असा माझा विश्वास आहे. देवपित्या, माझ्या जीवनप्रवासाचा आनंद मी घेणार आहे, आणि तुझ्या गौरवासाठी जगणार आहे!*

ही प्रार्थना तुम्ही प्रामाणिकपणे केली असेल, तर तुमच्या जीवनातील सर्वांत महत्त्वाचा निर्णय तुम्ही घेतलेला आहे. तुम्हांला काहीही वाटत असले तरी देवाने तुमची प्रार्थना ऐकून तिचे उत्तर दिलेले आहे. शांती किंवा आनंद, सुटका किंवा स्वातंत्र्य अशी भावना तुम्हांला जाणवत असेल,

किंवा सध्या काहीच वाटत नसेल. पण तुमच्या भावनांना तुमच्यावर नियंत्रण ठेवू देऊ नका. देवाच्या वचनावर विश्वास ठेवा, कारण तो विश्वासू आहे आणि त्याची अभिवचने तो पाळतो. त्याने म्हटले,

> पिता जे मला देतो ते सर्व माझ्याकडे येईल आणि जो माझ्याकडे येतो त्याला मी मुळीच घालवून देणार नाही. – योहान. 6:37

देवाने सदोदित, अगदी जगाच्या अंतापर्यंत तुमच्याबरोबर राहण्याचे अभिवचन दिले आहे. तुम्हांला त्याची नेहमीच जाणीव होईल असे नाही, पण तो सर्वदा सर्वत्र असतो. त्याचे नेत्र सतत तुमच्यावर असतात आणि तुमचे रक्षण करतात. तुम्हांला ज्या गोष्टींची काळजी वाटते त्या सर्वांची त्याला काळजी आहे, आणि त्या पूर्ण करण्याचे अभिवचन तो देतो. त्याने तुमच्यामध्ये चांगले काम सुरू केले आहे आणि तो ते पूर्णत्वास नेईल (उत्पत्ती 28:15; स्तोत्र. 138:8; फिलिप्पै. 1:6).

अभिनंदन, तुम्हांला येशू हा सर्वोत्कृष्ट मित्र मिळाला आहे. तुम्ही त्याच्याविषयी कशाविषयीही आणि सर्व काही बोलू शकता कारण तो नेहमीच तुम्हांला समजून घेतो (इब्री. 4:15). तो कधीही तुम्हांला नाकारत नाही, किंवा तुमचा धिक्कार करीत नाही. देवाच्या दृष्टीने फार मोठे असे काही नाही, आणि म्हणूनच फार लहान, क्षुल्लक असेही काही नाही. तुमच्या सर्व मार्गांत तुम्ही त्याचा स्वीकार करावा, आणि तुमच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्याला आमंत्रण द्यावे अशी त्याची इच्छा आहे.

तुम्ही नवीन उत्पत्ती झाला आहात. जुन्या गोष्टी होऊन गेल्या आहेत, आता सर्व काही नवे झाले आहे (2 करिंथ. 5:17). तुम्हांला अगदी नवीन सुरुवात मिळते.

तुमच्याकडून चुका होतील – आपणा सर्वांकडून चुका होतात. तुम्हांला खूप काही शिकायचे आहे, जीवनभराचा प्रवास तुम्ही सुरू केला आहे. तुमच्याकडून चुका होतील तेव्हा हे नेहमी लक्षात ठेवा, तुम्ही विनंती केली तर देवाची क्षमा आणि शुद्धता तुम्हांला उपलब्ध आहे. कोणत्याही पापाचा लगेचच पश्चात्ताप करा आणि देवापासून काहीही लपवून ठेवण्याचा प्रयत्न करू नका. कारण देवाला सर्व काही माहीत असते.

देव तुमच्यावर खूप प्रीती करतो. तो सर्वदा तुमच्यावर प्रीती करतो. तुम्ही चांगले वागता तेव्हा देव तुमच्यावर अधिक प्रीती करतो आणि तुम्ही वाईट वागता तेव्हा कमी प्रीती करतो असे मुळीच नाही. तो तुमच्यावर फक्त प्रीती करतो!

आता तुम्ही नवीन जीवनशैली शिकू शकता.

# *प्रकरण 4*

# नवीन जीवनशैली

देवासह आणि देवासाठी जगायच्या नवीन जीवनशैलीचा तुम्ही अंगिकार करीत असताना त्याची अनेक तत्त्वे जगाच्या दृष्टीने तुम्हांला उलटी वाटतील. पण खरे पाहता जग उलटेपालटे झाले आहे आणि देवाचे राज्य सरळ योग्य दिशेने आहे. देवाच्या पद्धतींनी गोष्टी करण्याची आपल्याला सवय नाही, आणि सुरुवातीला आपल्याला त्या समजण्यास कठीण वाटतील.

## बाप्तिस्मा

येशू ख्रिस्तावरील नवीन विश्वासणारा या नात्याने ज्या गोष्टी तुम्ही केल्या पाहिजेत त्यातील पहिली गोष्ट म्हणजे बाप्तिस्मा. बाप्तिस्मा हे ख्रिस्ताला अनुसरण्याच्या तुमच्या निर्णयाचे बाह्य चिन्ह आहे. बाप्तिस्मा घेणारी व्यक्तीने पाण्यात जाणे हे त्याच्या जुन्या जीवनाचे प्रतीक आहे. पाण्यातून त्यांना बाहेर काढले जाते तेव्हा ते नवीन जीवनामधील पुनरुत्थानाचे दर्शक आहे. देवाची आज्ञा पाळण्यासाठी आपण ही गोष्ट करतो.

> त्याच्या लाक्षणिक अर्थाने आता बाप्तिस्मा येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाच्या द्वारे तुमचे तारण करीत आहे. त्याचा अर्थ केवळ

देहाचा मल धुऊन टाकणे नव्हे, तर शुद्ध भावाने परमेश्वराचे ऐकणे, असा आहे.

— 1 पेत्र. 3:21

पेत्र त्यांना म्हणाला, पश्चात्ताप करा आणि तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येकजण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या; म्हणजे तुम्हांला पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल.

— प्रे.कृ. 2:38

## चर्चला जाणे

ज्या दुसऱ्या एका गोष्टीची मी जोरदार शिफारस करते, ती म्हणजे स्थानिक मंडळीत सहभागी होणे. माझ्या गॅरेजमध्ये बसल्यामुळे मी जशी मोटारगाडी होऊ शकत नाही, तसेच चर्चला जाण्यामुळे कोणी ख्रिस्ती होत नाही. केवळ चर्चला जाण्यामुळे आपण ख्रिस्ती होत नाही, पण आपण जर ख्रिस्ती विश्वासणारे असू, तर आपल्याला देवाची उपासना करण्याची आणि इतर विश्वासणाऱ्यांच्या सहभागितेची इच्छा असली पाहिजे. तसेच मंडळी किंवा चर्च हे असे ठिकाण आहे की जेथे आपण देवाचे वचन शिकू शकतो.

सर्वच मंडळ्या चांगल्या मंडळ्या आहेत असे नाही. काही मंडळ्या या केवळ बाहेरून चांगल्या दिसणाऱ्या मोठ्या इमारती असतील, पण कोणालाही खऱ्या अर्थाने मदत होईल असे त्यांच्यात काहीही नसते. तुम्हांला देवाच्या वचनातून खायला न घालणाऱ्या (न शिकवणाऱ्या), देवासोबतच्या तुमच्या वाटचालीत रोज वाढत जाण्याची चालना न देणाऱ्या

मंडळीत तुम्ही जात असाल, तर असे करणारी मंडळी सापडेपर्यंत तुम्ही तिचा शोध घ्या. डॉक्टरांप्रमाणेच सर्व मंडळ्या पूर्णपणे चांगल्या असतात असे नाही, पण त्या पूर्णपणे वाईट असतात असेही नाही. तुमच्यासाठी योग्य असलेल्या मंडळीचा शोध तुम्ही घ्यायचा आहे. काही लोकांना मोठ्या मंडळ्या आवडतात, तर काहींना लहान मंडळ्या आवडतात. काही लोकांना एक पंथ (डिनॉमिनेशन) आवडतो, तर दुसऱ्यांना दुसरा पंथ आवडतो. तसेच काहीजणांना कोणत्याच पंथाची मंडळी आवडत नाही, म्हणजे ते मोठ्या संस्थांवर विश्वास ठेवीत नाहीत. मुख्य मुद्दा हा आहे की, तुम्ही मंडळीशी तुमची चांगली समर्पितता असेल तर तुम्हाला फायदा होईल. तुमच्यासारखाच विश्वास असेलल्या लोकांशी मैत्री करण्याची संधी त्यामुळे तुम्हांला मिळते, तसेच तुमची सामाजिक उठबस नैतिक पातळीवर होत असल्यामुळे जगिक मोहांचा सामना करण्यासाठी मदत होईल.

ख्रिस्ती या नात्याने तुमची जेथे वाढ होत आहे अशा मंडळीतच जाण्याची खबरदारी घ्या. नवीन विश्वासणाऱ्याने अनेक गोष्टी गोष्टी शिकण्याची गरज असते. जर तो शिकणार नाही, आणि प्रगती करणार नाही, तर पुन्हा जुन्या मार्गांत घसरण्याचा धोका त्याला असतो.

लहान बायबल अभ्यासगट हे नवीन विश्वासणाऱ्यांसाठी जास्त फायदेशीर असतात. लहान गटांत तुम्हांला शिकण्याची, प्रश्न विचारण्याची, तुमच्यासाठी प्रार्थना केली जाण्याची आणि इतरांसाठी प्रार्थना करण्याची चांगली संधी मिळू शकते. तुमच्या मंडळीत प्रौढांसाठी बायबल अभ्यासगट किंवा गृहगट असतील अशी आशा आहे. मंडळी हे फक्त सेवा करून घ्यायचे ठिकाण नाही, तर सेवा करायचेही ठिकाण आहे. इतरांकडून घेत असतानाच तुम्ही त्यांना दिलेही पाहिजे.

# समर्पण

समर्पित असणे फार महत्त्वाचे आहे. एखादी चूक करून जीवनात सावळागोंधळ माजवून देण्याचा हा प्रश्न नाही, तर सतत चुका करीत राहण्याचा आहे. तसेच एखाददुसरी चांगली गोष्ट केली तर, देवाने दिलेल्या नवीन जीवनात त्याचा काही उपयोग होणार नाही. आपण टिकून राहिले पाहिजे, आणि जे आपण करायला हवे ते करीत राहिले पाहिजे. कधी कधी आपल्याला ते करावेसे वाटले नाही तरी केले पाहिजे. आपण आपल्या वागण्यात सातत्य ठेवले पाहिजे. देवाने आपल्याला स्वनियंत्रणाचा आणि शिस्तीचा आत्मा दिला आहे (2 तीमथ्य. 1:7), तुम्ही त्याचा उपयोग केला पाहिजे.

देवासोबत वेळ घालवण्यासाठी समर्पित असा. त्याचे वचन वाचा आणि त्याचे वचन म्हणजे पवित्र शास्त्र समजण्यासाठी उपयुक्त ठरतील अशी पुस्तके वाचा. पवित्र शास्त्राचे शिक्षण देणाऱ्या सीडी किंवा टेप्स ऐका. टीव्हीवरील चांगले ख्रिस्ती कार्यक्रम पाहा. प्रार्थनेसाठी वेळ काढा. दिवसभरात प्रार्थना करायला वेळ काढत जा. तुमच्याशी संबंधित असलेल्या प्रत्येक गोष्टीबाबत देवाला रस आहे, आणि प्रार्थना म्हणजे देवाबरोबर संभाषण करणे. ख्रिस्ती विश्वासणारे म्हणून वाढत असताना, देवाशी कसे बोलावे एवढेच तुम्ही शिकणार नाही, तर देवाचे बोलणे कसे ऐकावे हेही शिकाल. त्यामुळे देवासोबतच्या तुमच्या वाटचालीला एक नवीन परिमाण मिळेल.

ज्या दुसऱ्या एका गोष्टीबाबत समर्पण फार महत्त्वाचे आहे ती म्हणजे देणे. देवाने तुम्हांला इतके काही दिले आहे की, त्याला आणि पृथ्वीवरील त्याच्या कार्यासाठी द्यावे असे तुम्हांला साहिजकच वाटेल. तुम्हांला मदत

केली जाते तेव्हा इतरांना मदत करण्याची इच्छा होणे साहजिकच आहे, आणि तसे करण्याचा एक मार्ग म्हणजे तुमच्या मंडळीला आणि ज्या सेवाकार्यांनी तुम्हांला मदत केली आणि ज्यांच्याविषयी तुम्हांला भरंवसा वाटतो त्यांना देणे. जे काही आपण देवाला देतो त्याच्या कितीतरी पट जास्त तो आपल्याला देतो. त्याचे वचन सांगते आपण जे पेरतो त्याचीच कापणी करतो.

ख्रिस्ताचा स्वीकार करण्यापूर्वी आणि त्याच्यामध्ये नवीन उत्पत्ती होण्यापूर्वी आपल्याला देण्यामध्ये काही रस नव्हता. आपण स्वार्थी होतो, आणि दुसऱ्यांनी आपल्याला द्यावे अशी अपेक्षा करीत होतो, पण येशूवरील आपली प्रीती जसजशी वृद्धिंगत होत जाते, तसे आपले अंतःकरण बदलते.

## पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा

बॅप्टाईज म्हणजे पाण्यात पूर्णपणे बुडवणे. पाण्यात बुडवलेली कोणतीही वस्तू सछिद्र असेल तर तिच्यात पाणी भरते. तुम्ही खुले (सछिद्र) असाल तर तुम्ही पवित्र आत्म्याने पूर्णपणे भरून जाऊ शकता. तुमचा तारणारा म्हणून तुम्ही येशूला स्वीकारल्यावर तुम्हांला पवित्र आत्मा मिळतो. पण त्यावेळी तुमच्या अंतःकरणाती प्रत्येक खोली उघडून त्याला ती भरून देण्यास त्या वेळी बहुधा तयार नसता.

तुम्हांला पवित्र आत्मा मिळाला आहे, पण त्याने तुम्हांला पूर्णपणे भरले आहे की याची तुम्हांला खात्री हवी असते. देवाला तुमचा उपयोग त्याच्या सेवेमध्ये करून घ्यायचा आहे. तुम्ही यशस्वी आणि उत्पादनक्षम (पीक देणारे) व्हावे म्हणून त्याच्या आत्म्याची तुम्हांला गरज आहे.

आपले रोजचे जीवन जगण्यासाठी आपल्याला मदत व्हावी म्हणून देव आपल्याला दैवी देणग्याही देतो. ही दाने निरनिराळी आहेत आणि प्रत्येकाला ती मिळतात, पण काही दाने इतर दानांपेक्षा प्रबल असतात. मला शिकवण्याचे दान आहे, तर कोणाला संगीताचे किंवा व्यवस्थापनाचे, दया किंवा मदत करण्याचे दान आहे. ज्यांची आपल्याला माहिती किंवा जाणीव असावी अशी  नऊ दाने 1 करिंथ. 12:7-10 मध्ये सांगितलेली आहेत. एवढेच नाही, तर आपण ती मिळावीत अशी इच्छा बाळगली पाहिजे असे शिकवले आहे. यात ज्ञानाची उक्ती, सुज्ञता, विश्‍वासाचे दान, आरोग्य देण्याचे सामर्थ्य, चमत्कार करणे, भविष्य (देवाची इच्छा आणि हेतू यांचा अर्थ सांगणे), चांगले आत्मे आणि दुष्ट आत्मे यांच्यातील फरक ओळखणे, अन्य भाषांत बोलणे, आणि अशा भाषांचा अर्थ सांगणे यांचा समावेश आहे.

ही दाने तुम्हांला समजली नाहीत तरी देवाने ती तुम्हांला द्यावीत, आणि त्यांच्याविषयी व ती कशी वापरावीत याविषयी त्याने तुम्हांला शिकवावे म्हणून प्रार्थना करण्यास मी तुम्हांला उत्तेजन देते. लोकांनी अन्य भाषा (आत्मिक भाषा) बोलल्याची अनेक उदाहरणे आपल्याला पवित्र शास्त्रात पाहायला मिळतात. आपण अन्य भाषेत बोलतो तेव्हा आपण देवाशी गुप्त आणि रहस्यमय गोष्टी बोलतो, आणि आपण स्वतःची उन्नती साधतो. प्रेषित पौलाने म्हटले की, प्रत्येकाने अन्य भाषेत बोलावे अशी त्याची इच्छा आहे (1 करिंथ. 14:2, 4-5).

अन्य भाषेचे दान अनेक वर्षांपासून मंडळीत मतभेद होण्याचे कारण ठरले आहे. काहीजणांना वाटते की, पवित्र आत्म्याची दाने आजसाठी आहेत, तर इतर काहीजणांना ती आजसाठी नाहीत असे वाटते. माझ्या

जीवनात मी वैयक्तिकरित्या या दानांचा अनुभव घेतला आहे आणि तीस वर्षे अन्य भाषांत बोलत आहे, म्हणून ती आजच्या काळासाठी आहेत हे मला माहीत आहे. आपल्याला मदत करील अशा प्रत्येक गोष्टीची आपल्याला गरज आहे.

जी गोष्ट मिळाली नाही, किंवा समजत नाही अशा गोष्टी लोक बहुधा नाकारतात. हे चूक आहे. आपण पवित्र शास्त्र वाचले पाहिजे आणि ते जे सांगते त्यावर विश्वास ठेवला पाहिजे.

तुम्ही पवित्र आत्म्याच्या दानांवर नव्हे, तर पवित्र आत्म्यावर लक्ष केंद्रित करावे असा इषारा मी देते. काही लोक अन्य भाषेचे दान किंवा दुसऱ्या दानांचा प्रमाणापेक्षा जास्त उदोउदो करतात. आपण बुटांची जोडी खरेदी करण्यासाठी दुकानात जातो तेव्हा आपण बुटांची जीभ (टंग) मागत नाही. आपण बूट मागतो आणि त्यांची जीभ त्यासोबत मिळते. पवित्र आत्म्याच्या बाबतीतही असेच आहे. तुमच्या जीवनात त्याचे सान्निध्य अधिक मिळावे म्हणून प्रार्थना करा, म्हणजे अन्य भाषा आणि इतर दाने योग्य वेळी तुम्हांला मिळतील.

## देवाकडून मिळणाऱ्या बक्षिसांची नव्हे, तर त्याच्या सान्निध्याची अपेक्षा करा

तुमच्यासाठी चांगल्या गोष्टी करायची देवाची इच्छा आहे. तो तुम्हांला खूप आशीर्वाद देऊ इच्छितो, पण तो तुमच्यासाठी काय करू शकतो यावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी तो जो काही किंवा जो कोणी आहे त्यावर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे. कल्पना करता येणार नाही इतका देव अद्‌भुत आहे, आणि त्याच्या समक्षतेत असणे अद्‌भुत आहे.

तुम्ही त्याचे मुख पाहत असताना, त्याचे हात सतत खुले, पसरलेले आहेत हे तुमच्या लक्षात येईल. पण तुम्ही फक्त त्याच्या हाताकडेच पाहत राहाल तर त्याचा अपमान होईल. कोणाच्या तरी वैयक्तिक फायद्यासाठी आपला उपयोग करून घेतला जावा हे कोणालाही – देवालाही – आवडत नाही.

तुम्हांला जे पाहिजे किंवा ज्याची गरज आहे, ते देवाकडे मागा आणि जर ते तुमच्यासाठी चांगले असेल तर देव त्याच्या वेळेनुसार ते तुम्हांला देईल. पण दुसऱ्या कोणत्याही गोष्टीपेक्षा तुमच्या जीवनात देवाची अधिक गरज आहे हे नेहमी लक्षात ठेवा. त्याचे अधिक सान्निध्य, त्याचे मार्ग, त्याचे व्यक्तित्व, त्याची सुज्ञता, त्याचे सामर्थ्य इ.

देव सर्व काही आहे, आणि त्याच्याशिवाय आपण कोणीही नाही. येशूने म्हटले, "माझ्यापासून वेगळे असल्यास तुम्हांला काही करिता येत नाही" (योहान. 15:5).

> कारण सर्व काही त्याच्याचपासून, त्याच्याच द्वारे व त्याच्याच प्रीत्यर्थ आहे. त्याला युगानुयुग गौरव असो. आमेन.
>
> – रोम. 11:36

## खूप काही शिकायचे आहे

तुम्ही शिकल्या पाहिजेत अशा इतक्या बाबी आहेत की त्या सर्वांचा समावेश या लहानशा पुस्तिकेत करणे शक्य नाही. तुमचा विश्वास ज्यावर आधारित आहे ती सिद्धान्ततत्त्वे आणि ख्रिस्तीत्वाची मूलभूत शिकवण तुम्ही शिकली पाहिजे. बहुतेक मंडळ्यांत नवीन विश्वासणाऱ्यांसाठी अभ्यासवर्ग घेतले जातात. अशा एखाद्या वर्गात तुम्ही जावे असे मी सुचवते.

येशूचा जन्म कुमारीच्या पोटी झाला हे तुम्ही शिकाल. हे अशक्य वाटते हे मला माहीत आहे, पण ते खरे आहे आणि याचे कारण तुम्ही समजून घेणे महत्त्वाचे आहे. ज्यांना अजूनही सुवार्ता माहीत नाही, त्यांना ती समजावी म्हणून देवाला देणे महत्त्वाचे आहे हे तुम्ही शिकाल. तुम्ही त्र्यैक्याविषयी शिकाल. पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा अशा त्र्यैक देवाची सेवा करणे हे तुम्ही शिकाल. देवदूतांचे सेवाकार्य, यशूच्या रक्ताचे महत्त्व, देवाचे बोलणे कसे ऐकावे, नितीमत्त्वाचे तत्त्व, पश्चात्ताप आणि इतर अनेक गोष्टी तुम्ही शिकाल.

या प्रत्येक गोष्टीविषयी मी या पुस्तकात सांगू शकणार नाही, पण तुमच्या नवीन जीवनासाठी ज्या गोष्टी मूलभूत महत्त्वाच्या आहेत असे मला वाटते त्यांविषयी मला तुम्हांला सांगायचे आहे. चला, तर मग आपण त्यांचा अभ्यास करू या.

# प्रकरण 5

# नवीन विचारसरणी

सर्वस्वी निराळ्या पद्धतीने विचार करण्यास शिकणे ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. तुमच्यासाठी आणि तुमच्या जीवनासाठी देवाची चांगली योजना आहे, पण त्यासंबंधी तुम्ही देवाशी करार केला पाहिजे. सैतानाचीदेखील तुमच्यासाठी आणि तुमच्या जीवनासाठी योजना आहे, पण ती चांगली नाही. चोर म्हणजे सैतान केवळ चोरी करण्यासाठी, घात करण्यासाठी आणि नाश करण्यासाठी येतो (योहान. 10:10). आपण चुकीच्या विचारांवर विश्वास ठेवून त्याच्यासोबत करार करू म्हणून तो सर्व प्रकारचे चुकीचे विचार आपल्या मनात घालतो. अशा प्रकारे तो लोकांची फसवणूक करून त्यांच्या जीवनात प्रवेश मिळवतो.

> देवाची उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे हे तुम्ही समजून घ्यावे, म्हणून ह्या युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वतःचे रूपांतर होऊ द्या. – रोम. 12:2

जोपर्यंत आपली विचारशैली बदलत नाही, तोपर्यंत आपली जीवने बदलू शकत नाहीत हे वरील शास्त्रवचन स्पष्ट सांगते. तुम्हांला नवीन जीवन हवे असेल तर तुम्हांला नवीन विचारशैली (विचार करण्याची नवीन पद्धत) हवी. आपणा प्रत्येकासाठी देवाची चांगली योजना आहे, पण

योग्य प्रकारे विचार करण्याचे महत्त्व आपण शिकल्यावरच ती प्रत्यक्षात आल्याचे आपल्याला पाहायला मिळेल.

## तुम्ही तुमच्या विचारांवर नियंत्रण ठेवू शकता

मी पूर्वी होते तसेच कदाचित तुम्ही असाल आणि आपल्या विचारांवर आपले काही नियंत्रण नाही असे तुम्हांला वाटत असेल. पण हे बरोबर नाही. काय विचार करायचा किंवा नाही हे तुम्ही ठरवू शकता, आणि हे तुम्ही काळजीपूर्वक केले पाहिजे. जेथे मन जाते तेथे मनुष्य जातो. आता काहीतरी खायला मिळाले तर बरे अशा प्रकारे खाण्याविषयी विचार सुरू करण्याचा अनुभव आपणा प्रत्येकाला आहे. एखादे आईसक्रीम, डोनट किंवा अजून एखादा जिभेला पाणी आणणारा पदार्थ खावासा वाटतो. त्याविषयी जितका जास्त विचार आपण करतो, तितका तो खाण्याची प्रबळ इच्छा आपल्याला होते. त्याविषयी आपण जास्त विचार केला, तर कदाचित पटकन गाडीत बसून आपण दुकानात जाऊन तो घेऊन येऊ. पण तो खाल्ल्यानंतर मात्र “अरेरे, एवढ्याशा गोष्टीसाठी आपण कितीतरी मोलवान वेळ वाया घालवला” अशी खंत आपल्याला वाटेल.

कोणी आपल्याला दुखावले असेल तर आपल्याला दुखावणारी जी गोष्ट त्याने/तिने केली असेल तिचाच विचार आपण करीत बसतो, त्यामुळे त्या व्यक्तीचा आपल्याला अधिकच राग येऊन आपण अस्वस्थ होतो. आपल्या विचारांचा आपल्या भावनांवर परिणाम होतो आणि आपल्या शब्दांनी आपण त्या व्यक्त करतो.

पुढच्या वेळी तुम्ही अस्वस्थ किंवा निराश झाला, तर आपण कशाविषयी विचार करीत होतो हे स्वतःला विचारा म्हणजे तुमचे विचार आणि तुमच्या भावना यांच्यातील संबंध तुमच्या लक्षात येईल.

आपले मन हे रणभूमी आहे, आणि रणभूमीवर आपण सैतानाविरुद्ध लढत आहोत. 2 करिंथ. 10:4-5 ही वचने आपल्याला शिकवतात की, आपण सर्व प्रकारचे विचार आणि कल्पना अंकित करून येशूच्या अधीन केल्या पाहिजेत. याचा अर्थ असा की आपण देवाच्या वचनानुसार विचार केला पाहिजे. ख्रिस्ताच्या शिकवणीशी सुसंगत नसलेली कोणतीही गोष्ट आपण मनातून काढून टाकली पाहिजे, ती सैतानाकडून आलेली लबाडी आहे हे लक्षात घेऊन आपण तिचा नाकार केला पाहिजे. तुमच्या शत्रूने म्हणजे सैतानाने तुमच्या विचारांवर ताबा मिळवला तर तो तुमच्या जीवनावर आणि तुमच्या भवितव्यावर ताबा मिळवील.

उदाहरणार्थ, तुमच्या मनात आत्महत्येचे विचार येत असतील, तर देव ते विचार तुमच्या मनात घालत नाही. त्याला तर तुम्ही जगावे आणि जीवनाचा आनंद लुटावा असे वाटते. आपण चांगले नाही, कुचकामी आहोत, आपल्यावर कोणी प्रीती करीत नाही, असे विचार तुमच्या मनात येत असतील तर ते विचार देवाकडून येत नाहीत, कारण ते देवाच्या वचनाशी सुसंगत नाहीत.

## नकारात्मक विचारसरणी

कुठल्याही प्रकारच्या नकारात्मक विचारसरणीबाबत सावध राहा. देवाविषयी किंवा तुमच्या जीवनाविषयी असलेल्या त्याच्या इच्छेबाबत नकारात्मक असे काहीही नाही. ग्लास अर्धा रिकामा आहे असे न समजता, अर्धा भरलेला आहे असा दृष्टीकोन बाळगणे चांगले आहे. सकारात्मक विचारसरणीमुळे कोणाचेच नुकसान होत नाही.

आतापर्यंतचे तुमचे जीवन कसेही असले तरी आतापासून तुमच्या भवितव्यासाठी तुम्ही सकारात्मक दृष्टीकोन बाळगला पाहिजे. देवासोबत

करार करा आणि तुमच्या बाबतीत चांगल्या गोष्टी घडणार आहेत असा विचार करू लागा. मी पूर्वी होते तशा नकारात्मक व्यक्ती तुम्ही असाल, सकारात्मक विचार करण्यासाठी तुम्हांला सराव करावा लागेल. मी फार नकारात्मक, निराशावादी वातावरणात वाढले आणि काही ना काही संकट येईल, समस्या उभी राहील असेच मला वाटत असे. पण आपल्या नकारात्मक विचारसरणीमुळे आपल्या जीवनात समस्या येऊ शकतात हे मी शिकले.

> दुःखग्रस्ताला सर्व दिवस वाईट असतात, पण ज्याचे हृदय आनंदी असते त्याला सदा मेजवानी असते. — नीती. 15:15

पहिल्या प्रथम पवित्र आत्म्याने मला हे वचन दाखवले तेव्हा दुःखग्रस्त या शब्दाचा पुरेसा अर्थबोध मला झाला नाही. पण मग माझ्या लक्षात आले की, काहीतरी वाईट घडणार अशी आशा धरणारे निराशावादी आणि भीतीग्रस्त विचार, असा त्याचा अर्थ होतो. तसेच मला हे कबूल केले पाहिजे की, मी ज्याचा विचार करीत असे तसेच घडत असे. आणि माझे विचार नेहमी संकटाविषयी, त्रासाविषयीच असत. मला माझ्या जीवनात बदल हवा होता, पण देव तसे का करीत नाही हे मला समजत नसे. पण सरतेशेवटी माझ्या लक्षात आले की, देवान माझे जीवन बदलण्यापूर्वी मला माझी विचारसरणी बदलली पाहिजे.

कशाविषयीही – तुमच्या भविष्याविषयी किंवा तुमच्या भूतकाळाविषयीही – नकारात्मक, निराशावादी राहू नका. तुम्ही देवावर भरवसा ठेवला तर तुमच्यासाठी असलेल्या देवाच्या महान योजनेमध्ये तुमचा भूतकाळाचाही उपयोग होईल. तुम्ही केलेल्या सर्व चुका तुम्हांला अधिक

सुज्ञ करतील. तुम्ही त्यांच्यापासून शिकाल, आणि पुन्हा त्या चुका कधीच करणार नाही. तुमची आर्थिक स्थिती, मित्र, कुटुंब, तुमचे दिसणे, तुम्हांला असलेली किंवा नसलेली नोकरी, तुम्ही राहता कोठे, तुम्ही कोणती गाडी चालवता किंवा दुसऱ्या कोणत्याही गोष्टीविषयी निराशावादी असू नका. सकारात्मक दृष्टीकोन बाळगण्यास शिका, त्यामुळे तुम्हांला सकारात्मक, आशावादी आणि सामर्थ्यशाली जीवन मिळण्यास मदत होईल.

## काळजी अथवा चिंता करू नका

काळजी किंवा चिंता हे चुकीचे विचार करण्याचे दोन प्रकार आहेत. काळजीमुळे काहीही भले होत नाही, पण पुष्कळ नुकसान मात्र होते. तुमच्या सर्व चिंता देवावर टाका म्हणजे देव तुमच्या समस्यांचा समाचार घेईल. काळजीमुळे तुम्ही अकाली म्हातारे होता. तुम्हांला डोकेदुखीचा किंवा पोटदुखीचा त्रास होतो. कधीकधी तर या वेदना तुमच्या सहनशक्तीपलीकडे जातात. तुमच्या जीवनासाठी देवाची ही इच्छा नाही.

काळजी न करणे हे सुरुवातीला अवघड वाटेल, कारण स्वतःविषयी विचार करण्याची, पुढे काय करायचे याविषयी विचार करण्याची तुम्हांला सवय लागलेली असते. पण आता तुम्ही नवीन जीवनशैली शिकत आहात हे लक्षात ठेवा.

ज्या लोकांचा देवाशी काही नातेसंबंध नाही त्यांना आपण काळजी केलीच पाहिजे असे वाटेल, पण तुम्हांला तसे करण्याची गरज नाही. देव तुमच्या बाजूचा आहे, आणि तो तुम्हांला सांगतो की, तुमची सर्व ओझी माझ्यावर टाका (1 पेत्र. 5:7).

चिंता करणे म्हणजे उद्याची काळजी करण्यात आजचा दिवस घालवणे. येशूने सांगितले की तसे करू नका, कारण ज्या दिवसाचे दुःख त्या दिवसाला पुरे (मत्तय. 6:34). तशी वेळ येईल तेव्हा काय करायचे हे तुम्हांला समजेल, पण तोपर्यंत तुम्हांला कदाचित समजणार नाही. तुम्ही देवावर भरवसा ठेवावा अशी त्याची इच्छा आहे. तो कधीही उशीर करीत नाही, पण तसेच तो कधीही वेळेच्या अगोदरही करीत नाही. नवीन विश्वासणाऱ्याला प्रतीक्षा करणे कठीण जाते, कारण तुम्हांला त्याची सवय नसते. पण कालांतराने तुम्हांला ते आवडू लागेल. तुमचे मन तणावमुक्त असेल, आणि उद्याची चिंता न करता तुम्ही आजचा दिवस आनंदाने जगण्यास शिकाल.

ज्या ज्या वेळी तुम्हांला काळजी, चिंता करण्याचा मोह होईल त्या त्या वेळी सैतानाला आठवण करून द्या की आता तुम्ही देवाचे मूल आहा आणि तुमची काळजी घेण्याचे अभिवचन त्याने दिले आहे.

देवाच्या वचनाचा अभ्यास आणि मनन करणे हा तुमच्या मनाचे नवीकरण करण्याचा मार्ग आहे. योग्य विचारसरणी आणि चुकीची विचारसरणी यांतील फरक शिकण्याचा तो मार्ग आहे. उदा.आपल्या कुटुंबात गरीबी कायम चालत आल्यामुळे आपल्यालाही कायम दरिद्री राहणे भाग आहे असा विचार एखादी व्यक्ती करील. पण हे खरे नाही हे देवाच्या वचनात तुम्हांला आढळेल. देवाच्या मदतीने आणि त्याची तत्त्वे तुमच्या आर्थिक जीवनाला लागू करण्याद्वारे तुम्ही गरीबीचे चक्र तोडू शकता आणि जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात विपुल आशीर्वाद मिळवू शकता. देवाचे वचन म्हणते की, इतर सर्व गोष्टींबरोबर तुम्हांला चांगले आरोग्य मिळावे तसेच तुमच्या जीवाची उन्नती व्हावी असे देवाला वाटते

(3 योहान. 2). तुमच्या आत्म्यात तुम्ही वाढत असताना आणि देवाच्या आज्ञा पाळत असताना, तुम्ही सुज्ञपणे आणि चांगल्या प्रकारे हाताळू शकाल अशी प्रत्येक गोष्ट तो तुम्हांला देईल.

देव तुमच्या गरजा पुरवील. तुम्हांला भीतीच्या छायेखाली वावरण्याची गरज नाही. तुम्हांला नोकरीची गरज असेल तर तुम्ही प्रार्थना करू शकता आणि तुम्हांला नोकरी मिळावी म्हणून तो मदत करील. तो तुमच्यावर कृपादृष्टी करील आणि तुम्ही ज्याला स्पर्श कराल त्यात भरभराट आणि यश देईल.

तुम्हांला चांगले जीवन मिळावे असे येशूला वाटते. तुम्हांला जे जीवन देण्यासाठी तो मरण पावला त्या जीवनाचा आनंद तुम्ही घ्यावा असे तुम्हांला वाटते. ज्ञान मिळवा, समजबुद्धी मिळवा. ज्ञानाशिवाय लोकांचा नाश होतो, म्हणून ज्ञान मिळवा. येशू ख्रिस्त हा देवाकडून आपल्याला मिळालेली सुज्ञता आहे (1 करिंथ. 1:30). तुम्ही त्याच्या मार्गाने चालावे म्हणून तुमची सुज्ञता वाढावी आणि तुमचे मन प्रकाशित व्हावे म्हणून त्याला विनंती करा. “कारण मोत्यांपेक्षा ज्ञान उत्तम आहे; सर्व इष्ट वाटणाऱ्या वस्तु त्याच्याशी तुल्य नाहीत” (नीती. 8:11).

*युद्धभूमी मनाची* हे माझे खूप विक्री होणारे पुस्तक आहे. शक्य तितक्या लवकर तुम्ही ते मिळवून वाचावे अशी शिफारस मी करते. तुमच्या विचारसरणीचे नवीकरण करणे हे सुरुवातीला एखाद्या युद्धासारखे वाटेल, पण धीर सोडू नका. जे मनापासून परमेश्वराचा शोध घेतात त्यांना त्याचे प्रतिफळ मिळेल.

## *प्रकरण 6*

# बोलण्याची नवीन पद्धत

शब्द हे सामर्थ्याचे भांडार आहेत. त्यांच्यामध्ये सर्जनशील किंवा नाशकारक सामर्थ्य आहे. काळाच्या प्रारंभी, देव बोलला तेव्हा त्याने चांगल्या गोष्टी निर्माण केल्या, आणि आपण त्याचेच अनुसरण केले पाहिजे.

> जिव्हेच्या हाती मृत्यु व जीवन ही आहेत; तिची आवड धरणारे तिचे फळ भोगितात.
>
> ज्याला गृहिणी लाभते त्यास उत्तम लाभ घडतो. त्यास परमेश्वराचा अनुग्रह प्राप्त होतो. – नीती. 18:20-21

या वचनांचा काळजीपूर्वक अभ्यास केला तर आपल्या लक्षात येईल की, आपल्या शब्दांमध्ये परिणाम आहेत. काहींमुळे चांगले परिणाम होतात, तर काहींचे वाईट परिणाम होतात. बोलण्यासाठी आपण तोंड उघडतो तेव्हा आपल्या शब्दांत सामर्थ्य आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आपले विचार आपले शब्द होतात. याच मुख्य कारणामुळे सैतान आपल्या मनांत नकारात्मक विचार पेरतो. आपले स्वतःचे विचार म्हणून आपण त्यांचा स्वीकार केला तर आपण ते बोलू आणि आपल्या जीवनात

त्यांला जी घाणेरडी कृत्ये करायची आहेत ती करण्यासाठी त्याला खुला प्रवेश मिळेल.

> जो आपले तोंड व जिव्हा सांभाळितो, तो संकटांपासून आपला जीव बचावितो. – नीती. 21:23

आपण जे पाहतो आणि अनुभवतो त्याविषयी बोलणे हा जगातील सर्वांत मोठा मोह आहे. पण आपल्याला जे मिळू शकते असे देवाचे वचन सांगते त्यांविषयी आपण बोलावे अशी देवाची इच्छा आहे. तुम्ही तुमच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करावे असे मी सुचवत नाही, पण तुम्ही त्यांवर विजयी होऊ शकता असे मी सांगत आहे, आणि तुमच्या समस्यांच्या प्रसंगी तुम्ही कसे बोलता यावर बरेच काही अवलंबून असते.

अकरा दिवसांचा प्रवास संपवण्यासाठी इस्राएली लोक अरण्यात चाळीस वर्षे भटकत राहिले. त्याच त्याच डोंगरांभोवती ते प्रदक्षिणा घालत राहिले, पुढे गेले नाहीत. त्यांना अनेक समस्या होत्या, पण त्यांपैकी सर्वांत मोठी समस्या कुरकुरीची होती. त्यांच्या इच्छेप्रमाणे एखादी गोष्ट झाली नाही की, ते कुरकूर करीत असत. आपण जीवनाच्या अरण्यात तसेच डोंगरमाथ्यावर भटकत असताना देवाची स्तुती केली पाहिजे आणि त्याचे उपकार मानले पाहिजेत अशी देवाची इच्छा आहे. एखाद्या संकटात आपण किती काळ अडकून पडार हे त्या संकटात असताना आपण काय बोलतो यावर अललंबून असते.

तुम्हांला ऐकायला विचित्र वाटेल, पण तुमच्या शब्दांत सामर्थ्य असते. रोम. 4:17 सांगते की, ज्या गोष्टी अस्तित्वात नाहीत त्यांना त्या असल्यासारखी आज्ञा करणाऱ्या देवाची आपण सेवा करतो. जे घडावे

असे देवाला वाटते ते तो पाहतो आणि ते घडल्याप्रमाणे तो बोलतो. हे करण्यासाठी तुम्ही विश्वासाच्या डोळ्यांनी पाहिले पाहिजे. नैसर्गिक किंवा भौतिक जगात जे अजून दिसत नाही, किंवा जाणवत नाही ते अस्तित्वात आहे असे विश्वास गृहीत धरतो. विश्वास देवाची अभिवचने घेतो आणि ती खरी आहेत असे समजून त्यांप्रमाणे वागतो!

आपल्याला जर समस्या असेल, आणि देव आपली सुटका करील असा आपला विश्वास असेल तर आपण आता आनंदित होऊ. बदल प्रत्यक्ष दिसेपर्यंत थांबण्याची आपल्याला गरज नाही, कारण ती बदलली आहे असा आपला विश्वास असतो. देव आपल्यासाठी कार्य करीत आहे असा आपला दृढ विश्वास आहे.

यहेज्केल संदेष्याने आजूबाजूला पाहिले तेव्हा त्याला सगळीकडे मृत, कोरडी हाडे दिसली. देवाने त्याला विचारले की ही हाडे पुन्हा जिवंत होतील का? त्यावर यहेज्केलने उत्तर दिले, “देवा, केवळ तुलाच हे माहीत आहे.” त्याने हे उत्तर दिल्यावर देवाने त्याला हाडांशी बोलून त्यांना देवाचे वचन ऐकण्यास सांग असे सांगितले. यहेज्केलला सांगितले होते त्याप्रमाणे त्याने भविष्यसंदेश देण्यास सुरुवात केली, आणि सगळीकडे विखरून पडलेली हाडे जवळ येऊ लागली. त्यांच्यावर मांसपेशी आणि स्नायू तयार झाले आणि ते आपापल्या पायांवर उभे राहून मोठे सैन्य तयार झाले (यहेज्केल 37). देवाच्या शब्दांतील सामर्थ्याचे केवढे मोठे उदाहरण!

## देवाचे वचन मोठ्याने बोलणे

त्यांच्या रोजच्या आध्यात्मिक शिस्तीचा भाग म्हणून त्यांनी हेतूपूर्वक देवाचे वचन मोठ्याने म्हणावे असे मी सगळीकडे लोकांना शिकवत असते.

देवाने मला शिकवलेल्या गोष्टींपैकी ही फार महत्त्वाची गोष्ट आहे, त्यामुळे माझ्या मनाचे नवीकरण झाले असून जीवनाची दिशाच पूर्णपणे बदलून गेली असे मी सांगू शकते.

देवाचे वचन ही आत्म्याची तरवार आहे. सैतानाविरुद्ध वापरण्यासाठी हे सर्वांत प्राणघातक शस्त्र आहे. देवाचे वचन ऐकून तो घाबरतो आणि लटलट कापतो. सैतानाने येशूला मोहात पाडण्याचा प्रयत्न केल्याचा वृत्तान्त आपल्याला लूक. 4 अध्यायात पाहायला मिळतो. येशू अरण्यात होता, बऱ्याच दिवसांपासून त्याने काही खाल्ले नव्हते, मग सैतान त्याच्या मनात विचार घालू लागला. ज्या ज्या वेळी सैतान येशूशी लबाड बोलला त्या त्या वेळी येशूने “असे लिहिले आहे” अशी सुरुवात करून पवित्र शास्त्रातील वचन त्याला मोठ्याने ऐकवले आणि लबाडीचा धिक्कार केला. त्याच्या उदाहरणाचे पालन करायला आपण शिकतो तेव्हा आपण विजयपथावर वाटचाल करू लागतो.

तुम्ही काय म्हणता याकडे लक्ष द्यायला, ते समजून घ्यायला तुम्ही तयार आहात का? असला, तर आम्हा सर्वांप्रमाणेच तुमच्याही लक्षात येईल की, ज्या गोष्टी आपल्या जीवनात घडू नये असे आपल्याला निश्चितार्थाने वाटते अशा पुष्कळ गोष्टी आपण बोलत असतो. आपल्या बोलण्याद्वारे आपल्या जीवनातील आनंद आणि शांतीची पातळी आपण कमी किंवा जास्त करू शकतो असा माझा विश्वास आहे. माझे म्हणणे खरे असेल तर मग आपले जीवन दुःखी करणाऱ्या गोष्टी बोलण्याऐवजी सुखी करणाऱ्या गोष्टी आपण का बोलू नयेत?

विश्वासाने बोलणे हा तुमच्या नवीन जीवनाचा भाग आहे, म्हणून आताच सुरुवात करा. पुढे सांगितलेल्या विधानांसारखी विधाने तुम्ही करू शकताः

देव माझ्यावर प्रीती करतो आणि माझ्या जीवनासाठी त्याच्याकडे चांगली योजना आहे.
मी जेथे कोठे जातो/जाते तेथे माझ्यावर कृपादृष्टी होते.
मी ज्या गोष्टींवर हात ठेवतो तिची भरभराट होते, तिला यश मिळते.
देव माझ्यासाठी योग्य दारे उघडतो आणि चुकीची बंद करतो.
मी सुज्ञतेने वागतो/वागते.
माझे जीवन शांतीने भरलेले आहे.
मी आनंदी आहे.
मी प्रीतीपूर्ण जीवन जगतो.
आज माझ्या जीवनात काहीतरी चांगले घडणार आहे.
माझी सर्व मुले देवावर प्रीती करतात आणि त्याची सेवा करतात.
माझे वैवाहिक जीवन रोज आणि रोज सुखी होत आहे.
मी जेथे कोठे जाईल तेथे आशीर्वादाचे कारण बनत आहे.

ही यादी अशीच वाढवता येईल, तिला अंत असा नाहीच. फक्त तुम्ही जे काही बोलता ते देवाच्या वचनानुसार असल्याची खात्री करून घ्या. देवासोबत करार केल्याने तुमच्यासाठी संपूर्ण नवीन दुनिया उघडली जाईल. देवाची योजना त्यामुळे कार्यान्वित होईल, आणि आणि सैतानाने कितीही आदळआपट केली तरी त्याला ती थांबवता येणार नाही.

# प्रकरण 7

# स्वतःकडे पाहण्याचा नवीन दृष्टीकोन

तुम्ही स्वतःकडे कोणत्या नजरेतून पाहता? तुमच्या स्वतःविषयी असलेली तुमची प्रतिमा ही तुम्ही तुमच्या अंतःकरणाच्या पाकिटात जपून ठेवलेल्या फोटोसारखी आहे. अनेक वर्षे लोकांमध्ये सेवा केल्यावर माझ्या लक्षात आले आहे की पुष्कळ लोक स्वतःच स्वतःला फारसे आवडत नाहीत. माझ्या स्वतःशी माझे अनेक वर्षे खूप वाईट संबंध होते, त्यामुळे माझ्या जीवनातील प्रत्येक गोष्टीचा विचका होत होता. देव तुमच्यावर प्रीती करतो आणि तुम्ही स्वतःवर प्रीती करावी असे त्याला वाटते. अर्थात स्वार्थी किंवा स्व-केंद्रित प्रीती करू नये. तुमच्याकडे जे नाही ते तुम्ही इतरांना देऊ शकत नाही. देव आमच्यावर प्रीती करतो आणि त्या प्रीतीने प्रथम आम्हांला आरोग्य द्यावे आणि मग ती प्रीती आमच्यामधून इतरांमध्ये प्रवाहित व्हावी अशी त्याची इच्छा आहे. स्वतःवरच प्रीती करीत राहून तुम्ही देवाच्या प्रीतीची नाकार केला तर तुम्ही इतरांवर कधीही प्रीती करू शकणार नाही.

तुमचे स्वतःविषयीचे मत तुमच्या कामगिरीवर अवलंबून आहे का? बहुतेकांचे तसे असते आणि आपले स्वतःविषयीचे मत चांगले असू शकत

नाही, कारण आपल्याकडून नियमितपणे चांगलीच कामगिरी घडते असे नाही. आपण अपरिपूर्ण मानव आहोत आणि आपल्याकडून चुका होतात. आपल्याला योग्य गोष्टी करायच्या असतात, पण नेहमीच आपल्याकडून काही ना काही गोंधळ होतो. त्यामुळेच तर आपल्याला येशूची गरज आहे. आपल्या अशक्तपणांत तो त्याची शक्ती योग्य प्रकारे दाखवतो.

देवासाठी तुम्ही आश्चर्य नाही. त्याच्याशी नातेसंबंध प्रस्थापित करण्यासाठी त्याने तुम्हांला आमंत्रण दिले तेव्हाच तुम्ही काय आणि कसे आहात हे त्याला माहीत होते. आपल्या जीवनात आपण करणार असलेली प्रत्येक चूक त्याला माहीत आहे. तरीदेखील तो आपल्यावर प्रीती करतो. स्वतःकडे इतक्या कठोर दृष्टीने पाहू नका. देवाची कृपा रोज मिळवण्यास शिका. देवाच्या गौरवासाठी रोज तुम्हांला शक्य तितके चांगले करा. देवाने तुमच्यावर प्रीती करावी म्हणून नव्हे, तर तो तुमच्यावर प्रीती करतो म्हणून तुमचे सर्वोत्कृष्ट ते त्याला द्या. तो तुमच्यावर अगोदरपासूनच विपुल प्रीती करतो आणि करीत राहील, त्याची तुमच्यावरील प्रीती परिपूर्ण आहे. दिवसभरात तुमच्याकडून झालेल्या चुका, पापे यांची दिवसअखेरीस क्षमा मागा, स्वस्थ झोपा आणि नव्या दिवसाची सुरुवात आनंदाने करा.

सैतान तुमच्याविरुद्ध आहे, पण देव तुमच्या बाजूने आहे. तुम्ही देवाच्या बाजूने असले पाहिजे, कारण दोघांमध्ये एकमत होते तेव्हा हे ऐक्य सामर्थ्यशाली होते. देवाच्या दृष्टीने तुम्ही मोलवान आहात, आणि त्याच्या दृष्टीने उपयुक्त असणारी अनेक कौशल्ये तुमच्याकडे असतील. स्वतःच्या केवळ चुकाच पाहू नका. अजून किती चालायचे आहे याचा विचार करीत बसू नका– तर आपण किती लांबचा पल्ला गाठला याचा विचार करा. तुम्ही आता येशू ख्रिस्तावरील विश्वासणारे आहात. आणि जीवनातील सर्व सुंदर गोष्टींची ती सुरुवात आहे.

# नीतीमत्त्व किंवा धार्मिकता म्हणजे काय ते समजून घेणे

धार्मिकता ही आमच्या स्वतःच्या सत्कृत्यांनी नव्हे, येशू ख्रिस्तावरील विश्वासाने मिळते. ते देवाचे दान आहे, आणि तुम्ही येशू ख्रिस्ताला आपला वैयक्तिक तारणारा म्हणून स्वीकारता तेव्हा ते तुम्हांला मिळते.

या विधानाला किंवा सत्याला पाठिंबा देणारी अनेक शास्त्रवचने आहेत. तुम्हांला उत्तेजन मिळावे म्हणून त्यांपैकी काही मी सांगतेः

> ज्याला पाप ठाऊक नव्हते त्याला त्याने तुमच्याआमच्याकरिता पाप असे केले; ह्यासाठी की, आपण त्याच्या ठायी देवाचे नीतिमत्त्व असे व्हावे. – 2 करिंथ. 5:21

किती जोरदार शास्त्रवचन आहे हे! ख्रिस्त निष्पाप होता, तरीदेखील तुमच्यामाझ्यावरील प्रीतीमुळे त्याने आपले पाप स्वतःवर घेतले जेणेकरून देवपित्याशी आपले संबंध प्रस्थापित होतील. देव आता आपल्याकडे मान्यता पावलेले, त्याच्याशी योग्य नातेसंबंध असलेले अशा दृष्टीकोनातून पाहतो, कारण आपण येशूला आपला तारणारा म्हणून स्वीकारले आहे.

देव आमच्याविषयी असंतुष्ट आणि रागावलेला आहे असे समजून भयभीत होण्याऐवजी, आपण "ख्रिस्तामध्ये" त्याच्यासमोर उभे राहू शकतो आणि आपला स्वीकार केलेला आहे हे समजू शकतो.

> कारण नियमशास्त्रात सांगितलेली सत्कृत्ये करून कोणीही व्यक्ती नीतीमान ठरणार नाही. कारण मानवाला पापाची ओळख करून देणे हे नियमशास्त्राचे काम आहे. – रोम. 3:20

हे देवाचे नीतीमत्त्व तर येशू ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्वारे विश्वास ठेवणाऱ्या सर्वांसाठी आहे; त्यात भेदभाव नाही. – रोम. 3:22

तरी मनुष्य नियमशास्त्रांतील कृत्यांनी नीतिमान ठरत नाही, तर येशू ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्वारे ठरतो, हे जाणून आम्हीही ख्रिस्त येशूवर विश्वास ठेविला; ह्यासाठी की, आही ख्रिस्तावरील विशअवासाने नीतिमान ठरावे, नियमशास्त्रातील कृत्यांनी नव्हे; कारण नियमशास्त्रातील कृत्यांनी मनुष्यजातीपैकी कोणीही नीतिमान ठरणार नाही. – गलती. 2:16

येशू ख्रिस्तावरील तुमच्या विश्वासाच्या द्वारे तुम्ही देवासमोर उभे राहण्यास पात्र आहात हे समजून घेणे तुमच्या आध्यात्मिक वाढीसाठी महत्त्वाचे आहे. ते देवाकडून तुम्हांला मिळालेले दान आहे. देव आमच्यावर रागावलेला आहे अशी कल्पना करून आपण स्वतःकडे नेहमी वाईट दृष्टीकोनातून पाहिले, तर ज्या सामर्थ्यामध्ये आम्ही वाटचाल करावी अशी देवाची इच्छा आहे ते सामर्थ्य आपण गमावून बसू. येशू ख्रिस्तावरील विश्वासणारे या नात्याने आपल्याला सैतानावर अधिकार आहे, पण आपण नीतीमत्तेची वस्त्रे घालून देवासमोर उभे राहिले पाहिजे, पापाच्या चिंध्या पांघरून नव्हे.

इफिस. 6 वा अध्याय आपल्याला नीतीमत्त्वाचे उरस्त्राण धारण करण्यास सांगतो. उरस्त्राणामुळे सैनिकाच्या छातीचे रक्षण होते. तुमच्या स्वतःविषयी तुम्हांला काय वाटते? देवासमोर उभे राहण्यास तुम्ही पात्र आहात असा विश्वास तुम्ही बाळगू शकता का? तुमच्या चुकांवर नव्हे, तर येशूने तुमच्यासाठी जे काही केले त्यावर तुम्ही आपले लक्ष केंद्रित केले तर

तुम्ही बाळगू शकता. तुमच्याकडून चुका होतील तेव्हा तुम्ही ताबडतोब पश्चात्ताप करा आणि देवाची क्षमा मिळवा. केवळ याच मार्गामुळे आपण नीतिमत्त्वात चालू शकू. आपण आपल्या नीतिमत्त्वात चालणार नाही, कारण आपले नीतिमत्त्व फाटक्या चिंध्यांसारखे आहे. पण येशू ख्रिस्तावरील आपल्या विश्वासाच्या द्वारे देवाच्या नीतिमत्त्वात आपण वाटचाल करू शकू.

स्वतःविषयीचा हा सुंदर दृष्टीकोन, तुम्ही येशूवरील विश्वासणारे झाल्यामुळे जे “नवीन जीवन” तुम्हांला मिळाले त्या नवीन जीवाचा भाग आहे.

## स्वतःचा आनंद घेणे

आता तुम्ही स्वतःचा आनंद घेण्यास मुक्त आहात, आणि तुम्ही तो घ्यावी ही देवाची इच्छा आहे. इतर लोक तुमच्याविषयी का म्हणतात किंवा काय म्हणाले, यावर तुम्ही तुमची किंमत आधारित ठेवू नका. लोक तुमच्याशी कसे वागले किंवा तुम्ही काय साध्य केले यावर आधारित ठेवू नका. देवाला तुम्ही इतके मोलवान वाटला की, त्याने त्याच्या पुत्राला तुमच्यासाठी मरण्यास पाठवले आणि हेच आनंदोत्सव करण्याचे कारण आहे.

आपण जीवनाचा आनंद घ्यावा ही देवाची इच्छा आहे हे पवित्र शास्त्र आपल्याला स्पष्ट शिकवते, पण तुम्ही स्वतःचा आनंद घेणार नाही, तर हे शक्य नाही. तुमच्या स्वतःपासून तुम्ही कधीही दूर जाऊ शकणार नाही, अगदी क्षणभरही नाही. तुम्ही स्वतःचा आनंद घेणार नाही, तर तुमचे जीवन अगदी दयनीय होईल.

माझ्याप्रमाणेच तुम्हीदेखील तुमच्या परिचयाच्या लोकांपेक्षा निराळे असाल, पण काही हरकत नाही. देवाने काहीतरी उद्देशाने तसे केले

आहे. तो आपणा प्रत्येकाला थोडे निराळे निर्माण करतो. त्याला विविधता आवडते. तुम्ही विचित्र नाही, तर तुम्ही अद्वितीय आहात आणि दुसऱ्या कशाची तरी निव्वळ प्रतिकृती असलेल्या गोष्टींपेक्षा तुम्ही कितीतरी मोलवान आहात.

इतरांबरोबर स्वतःची तुलना करू नका आणि त्यांच्याशी स्पर्धा करण्यात आपले जीवन वाया घालवू नका (2 करिंथ. 10:12). तुम्ही जे आहात त्याचा आनंद घ्या. आम्हांप्रमाणेच तुमच्याही जीवनातील काही गोष्टी बदलण्याची गरज आहे, आणि त्या बदलण्यासाठी पवित्र आत्मा तुमच्या उर्वरित जीवनात कार्यरत राहील. हे कार्य तुमच्यामध्ये चालू असताना तुम्ही स्वतःचा आनंद घेण्यास मुक्त आहात ही चांगली वार्ता आहे.

## *प्रकरण 8*

# भीतीऐवजी विश्वास बाळगा

भीती म्हणजे काय हे आपणा सर्वांना माहीत आहे. ती त्रासदायक असून आपली प्रगती रोखते. भीती आपल्याला हादरवून सोडते, घामेघाम करते, दुर्बल करते, आणि ज्या गोष्टींचा सामना आपण करायला हवा त्यांच्यापासून आपल्याला पळवून लावते.

भीती देवापासून नाही. जे चांगले जीवन आम्ही जगावे अशी देवाची इच्छा आहे (2 तीमथ्य. 1:7) ते जीवन जगण्यापासून ती आम्हांला रोखते. विश्वास म्हणजे देवाचे सामर्थ्य, सुज्ञता, आणि चांगुलपणावर पूर्ण भिस्त ठेवणे. ज्या गोष्टी आपल्याला दिसत नाहीत त्यांच्या वास्तविकतेचा तो पुरावा आहे.

विश्वास आध्यात्मिक जगात कार्य करतो. जे दिसते आणि जाणवते त्यावरच केवळ विश्वास ठेवण्याची तुम्हांला सवय असेल, पण देवाचे लेकरू या नात्याने, न दिसणाऱ्या (आध्यात्मिक) गोष्टींवर तुम्ही विश्वास ठेवण्याची गरज आहे. आपण देवाला पाहू शकत नाही, कारण तो आत्मा आहे, पण आपण त्यावर ठाम विश्वास ठेवतो. आपल्याला नेहमीच देवदूत दिसतात असे नाही, पण ते सर्वकाळ आपल्या सभोवती राहून आपले रक्षण करतात असे देवाचे वचन सांगते. देव आणि त्याचे वचन यावरील

आपल्या विश्वासामुळे आपण आत्मिक जगात प्रवेश करू शकतो आणि ज्या गोष्टींचा आनंद आपण घ्यावा असे देवाला वाटते, पण ज्या वस्तुस्थितीत उतरलेल्या नाहीत, त्या खेचून आणू शकतो.

परिस्थितींकडे आपले लक्ष वेधून आपल्याला घाबरवून सोडण्यात सैतानाला आनंद वाटतो. पण कोणत्याही परिस्थितीपेक्षा किंवा सैतान जी भीती आपल्याला घालतो त्यांनी दबून न जाता आपण देवावर भिस्त ठेवावी अशी देवाची इच्छा आहे.

निराशाजनक, कठीण परिस्थितीत सापडल्यामुळे ज्यांची अंतःकरणे भीतीने भरून गेली अशा अनेक स्त्रीपुरुषांची उदाहरणे पवित्र शास्त्रात आहेत. पण त्यांनी देवावर विश्वास ठेवण्याची निवड केली, परिणामी त्यांना मोठ्या सुटकेचा अनुभव आला. तुम्ही विश्वासात जगणार की भीतीत जगणार याचा निर्णय घेतलाच पाहिजे. तुम्ही जर विश्वासाने जगण्याचा निश्चय केला नाही, तर तुम्ही विश्वासणारे ख्रिस्ती असूनही तुम्ही भीतीमुळे क्लेषदायक जीवन जगू शकता. तुम्ही आपला वैयक्तिक तारणारा म्हणून येशूला विश्वासाने स्वीकारले आहे. आता यापुढचे पाऊल म्हणजे विश्वासाने जगण्यास शिकणे.

> कारण तिच्यात देवाचे नीतिमत्त्व विश्वासाने विश्वासासाठी प्रगट झालेले आहे; नीतीमान विश्वासाने जगेल ह्या शास्त्रलेखाप्रमाणे हे आहे. – रोम. 1:17

आपण देवाची प्रीती आणि येशूचे मरण आणि पुनरुत्थान यांद्वारे आपण देवासमोर उभे राहण्यास पात्र आहोत हे समजून घेतले तर विश्वासात चालणे सोपे आहे हे आपल्या लक्षात येते. आपण स्वतःच स्वतःची

काळजी घेण्यापेक्षा देव आपली काळजी घेईल म्हणून त्याच्यावर आपण भरवसा ठेवू लागतो.

धैर्य म्हणजे भीतीचा अभाव नव्हे, तर भीती वाटत असूनही कृती करणे. देवाने त्याच्या सेवकांना भीती बाळगू नका असे सांगितले तेव्हा त्याने भीतीची जाणीव बाळगू नका असे सांगितले नाही, तर तर तुम्हांला कसेही वाटले, तरी त्याच्या आज्ञा पाळण्यास सांगितले. देवासोबतची आपली वाटचाल रोखण्यासाठी भीतीचा आत्मा नेहमी प्रयत्न करील हे देवाला माहीत आहे. म्हणून त्याच्या वचनात तो आपल्याला वरचेवर सांगतो की तो आपल्यासोबत नेहमी आहे, आणि आपण भय बाळगण्याची गरज नाही.

एलिनॉर रुझवेल्ट यांनी म्हटले, “भीतीच्या डोळ्यात डोळे घालून पाहण्याच्या प्रत्येक अनुभवामुळे तुम्हांला शक्ती, धैर्य आणि आत्मविश्वास मिळतो. जी गोष्ट तुम्ही करू शकणार नाही अशी गोष्ट तुम्ही केली पाहिजे.”

> खंबीर हो, हिंमत धर, त्याला भिऊ नको, त्यांना घाबरू नको; कारण तुझ्याबरोबर चालणारा तुझा देव परमेश्वर हा आहे; तो तुला सोडून जाणार नाही व तुला टाकणारही नाही.
>
> – अनुवाद 31:6

केवळ विश्वास देवाला संतोष देतो. आपल्याला देवाकडून विश्वासाने मिळते. म्हणून ख्रिस्तामधील नवीन विश्वासणाऱ्याने विश्वासाविषयी शिकणे आणि त्यात चालण्यास सुरुवात करणे अतिशय महत्त्वाचे आहे. विश्वास बळकट करणे हे स्नायू बळकट करण्यासारखेच आहे. तुम्ही

प्रत्येक वेळी विश्वासाचा थोडाथोडा व्यायाम करता, त्यामुळे तुमचा विश्वास बळकट होतो.

मत्तय. 17:20 आपल्याला शिकवते की, देवावर विश्वास ठेवणाऱ्याला सर्व गोष्टी शक्य आहेत. अगदी थोडासा विश्वासदेखील आपल्या जीवनातील डोंगर हलवू शकतो. तुमच्या समस्या सोडवण्याचा तुम्ही जीवनभर प्रयत्न केला असेल, पण निराशेशिवाय तुमच्या हाती काही लागले नसेल. तसे असेल तर तुम्ही नवीन अनुभवाच्या किनाऱ्यावर आहात. आता तुम्ही देवाशी बोलून (प्रार्थना करून) आणि तुमच्या प्रत्येक बाबतीत त्याला सहभागी होण्याची विनंती करू शकता, आणि माणसाला जे अशक्य आहे ते देवाला शक्य आहे याचा अनुभव तुम्हांला येईल.

तुमच्या विश्वासानुसार तुमच्यासाठी केले जाईल (मत्तय. 9:29). आयुष्यभर तुम्ही भीतीच्या छायेत जगला असाल, पण भीतीऐवजी देवावरील विश्वास बाळगण्याची वेळ आता आली आहे. नवीन मार्ग, नवीन पद्धती शिकण्यासाठी वेळ लागेल, पण निराश होऊन प्रयत्न सोडू नका. पृथ्वीवरील सर्व काही हळूहळू वाढण्याच्या नियमानुसार चालते. देव आपल्याला जे करायला सांगतो ते आपण करीत राहिलो, तर प्रत्येक गोष्ट हळूहळू बदलू लागेल.

# प्रकरण 9

# जीवनाचा आनंद घ्या

> चोर येतो तो केवळ चोरी, घात व नाश करावयास येतो; मी तर त्यांना जीवनप्राप्ती व्हावी व ती विपुलपणे व्हावी म्हणून आलो आहे.
>
> – योहान. 10:10

तुम्हांला जीवनाचा आनंद घेता यावा म्हणून येशू मरण पावला. पण याचा अर्थ असा नाही की, प्रत्येक गोष्ट तुमच्या मनाप्रमाणे घडेल आणि तुमच्या जीवनात कधीही अडचणी येणार नाहीत. याचा अर्थ असा की, देवासोबत असणाऱ्या तुमच्या नातेसंबंधामुळे जगातील प्रत्येक समस्या तुमच्या पायाखाली येईल आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने तुम्ही देवासोबत, देवासाठी पुनरुत्थित जीवन जगाल.

देव आपले खरेखुरे जीवन आहे. त्याच्यामध्ये आपण जगतो, वावरतो आणि आपले अस्तित्व आहे. देवामध्ये आनंद करण्यास शिकल्यावर जीवनातील प्रत्येक दिवसाचा आनंद तुम्ही घेऊ शकाल. तुमच्या बाबतीतीतल प्रत्येक गोष्टीची देवाला काळजी आहे, आणि पवित्र शास्त्र सांगते की, तुमच्या संबंधीची प्रत्येक गोष्ट देव परिपूर्ण करील. तो सर्वकाळ तुमच्या जीवनात कार्य करीत असून तुम्हांला त्याच्या इच्छेमध्ये आणत आहे.

चुकीच्या पद्धतीने देवाची भीती बाळगू नका. आपल्याला देवाविषयी आदरणीय भीती वाटली पाहिजे. याचा अर्थ असा की आपल्याला त्याचा आदर वाटला पाहिजे आणि तो सर्वसमर्थ असून तो जे म्हणतो, सांगतो ते सत्य आहे हे जाणून घेतले पाहिजे. पण आपण जेव्हा जेव्हा चूक करतो तेव्हा तेव्हा देवाला आपला राग येतो किंवा आपण अपयशी ठरलो तर देव आपल्याला शिक्षा करील अशी भीती आपण कधीही बाळगू नये. देव दयाळू आणि मंदक्रोध (लवकर राग न येणारा) आहे. तो सहनशील आहे, आपल्या दुर्बलता, आपले कमकुवतपण तो जाणतो.

आम्हा सर्वांसारखेच तुम्हीही असाल, तर बदलण्याची गरज असलेल्या बऱ्याच गोष्टी तुमच्या जीवनात आहेत – आणि देव त्या बदलील. पण चांगली बातमी ही आहे की, देव तसे करीत असताना तुम्ही देवाचा आणि तुमच्या जीवनाचा आनंद घेऊ शकाल.

आता सध्याचे तुमचे जीवन, तुम्हांला हवे तसे नसेल पण सध्या केवळ तेवढे एकच जीवन तुमच्याकडे आहे म्हणून त्याचा आनंद घेऊ लागा. त्याच्यातील चांगल्या गोष्टी शोधा. सकारात्मक विचार करा आणि जीवनातील चांगल्या गोष्टी पाहण्यास शिका. तुमचे कुटुंब आणि मित्र यांचा आनंद घ्या. त्यांच्यात बदल घडवण्याचा प्रयत्न करू नका. त्यांच्यासाठी प्रार्थना करा आणि देवाल त्यांच्यात बदल घडवू द्या.

तुमच्या कामाचा आनंद घ्या, तुमच्या घराचा आनंद घ्या आणि रोजच्या सर्वसामान्य जीवनाचा आनंद घ्या. तुम्ही देवावर विश्वास ठेवाल आणि चांगला दृष्टीकोन बाळगाल तर हे शक्य आहे. तुम्ही, तुमचे जीवन, तुमचे कुटुंब आणि जग यांविषयीच्या चुकीच्या गोष्टींकडे लक्ष लावू नका, तर देवाकडे लावा. तुमच्यासाठी देवाची चांगली योजना आहे, आणि ती

पूर्णत्वास नेण्याच्या कामास तो लागलाही आहे. येणाऱ्या चांगल्या गोष्टींची आशा धरून तुम्ही त्या पूर्ण होण्याअगोदरच आनंद करू शकता.

जीवनात जोपर्यंत समस्या आहेत तोपर्यंत आपण जीवनाचा आनंद कधीच घेऊ शकणार नाही असे समजून काही लोक जगतात, पण ही चुकीची विचारसरणी आहे. तुमच्या भूतकाळातील चुकांविषयी खंत करीत बसू नका. येशू ख्रिस्ताद्वारे जे महान नवीन भवितव्य तुम्हांला मिळाले आहे त्याविषयी विचार करीत राहा. ज्याविषयी आनंद करायचा तुम्ही ठरवाल त्याविषयी तुम्ही आनंद करू शकता. ट्राफिक जाममध्ये अडकल्यावर आनंद करायचे तुम्ही ठरवले, तर तेथेही तुम्ही आनंद करू शकता. जीवन जगण्याची नवीन पद्धत मी तुम्हांला शिकवत आहे, आणि जीवनाविषयी तुमच्या दृष्टीकोनाचा त्यात मोठा भाग आहे हे लक्षात ठेवा.

मला ज्या ठिकाणी जायचे आहे त्या रस्त्यावर असताना जेथे कोठे मी असेन तेथे आनंद करायचा निर्णय घेतला आहे. तुम्हीही तसेच करा असे माझे कळकळीचे सांगणे आहे. तुमच्या जीवनात देवाला बरेच काही करायचे आहे, आणि तो ते करीत असताना तुम्ही दुःखाने कुढत बसू नये असे त्याला वाटते. बालकांनी वाढून जसे मोठे झाले पाहिजे तसेच विश्वासणाऱ्यांनीदेखील वाढले पाहिजे. आपल्या अपेक्षेपेक्षा जास्त काळ चालणारी ही प्रक्रिया आहे, पण म्हणून ही प्रक्रिया चालू असताना आनंद न करण्यासाठी काहीच कारण नाही.

तुम्ही आजच्या आज परिपूर्ण झाले पाहिजे अशी अपेक्षा देव करीत नाही. या पृथ्वीवर असेपर्यंत तुम्ही कधीही परिपूर्ण होऊ शकणार नाही याची त्याला कल्पना आहे. पण आपणा प्रत्येकाने त्यासाठी प्रयत्न करीत राहावे असे त्याला वाटते. आपण रोज सकाळी उठून देवाची सेवा

करण्यासाठी प्रामाणिकपणे जास्तीत जास्त प्रयत्न केले पाहिजेत. आपण आपल्या चुका कबूल केल्या पाहिजेत, आपल्या पापांची क्षमा मागितली पाहिजे, आणि त्यांपासून मागे फिरण्यास आपण तयार असले पाहिजे. बाकीचे काम देव करील. तो त्याच्या पवित्र आत्म्याद्वारे आपल्यामध्ये कार्य करणे चालू ठेवील. तो आपल्याला शिकवील, आपल्याला बदलेल आणि आपला उपयोग करून घेईल. तुम्ही नवीन जीवनशैलीत पाऊल टाकले आहे, आणि याचा तुम्हांला कधीही पस्तावा होणार नाही याची मला खात्री आहे. देवाचा आनंद घ्या, स्वतःचा आनंद घ्या, आणि जे जीवन तुम्हांला देण्यासाठी येशू मरण पावला त्या जीवनाचा आनंद घ्या!

# तारणासाठी प्रार्थना

*देव पित्या, मी तुझ्यावर प्रीती करतो/करते. तू माझ्या पापांची क्षमा कर अशी विनंती मी तुला करीत आहे. येशू, मी तुझ्यावर विश्वास ठेवतो/ठेवते, तू माझ्यासाठी वधस्तंभावर मरण पावलास, तुझे निष्कलंक रक्त माझ्यासाठी सांडले, तू माझी जागा घेतलीस आणि माझी सर्व शिक्षा स्वतःवर घेतलीस. तू मेलास, पुरला गेलास आणि तिसऱ्या दिवशी तू मेलेल्यांतून पुन्हा उठलास यावर माझा विश्वास आहे. मृत्यू तुला बांधून ठेवू शकला नाही. तू सैतानावर विजय मिळवलास आणि नरकाच्या आणि मृत्यूच्या किल्ल्या त्याच्यापासून हिसकावून घेतल्यास. हे सर्व तू माझ्यासाठी केलेस असा माझा विश्वास आहे, कारण तू माझ्यावर प्रीती करतोस. मला ख्रिस्ती व्हायचे आहे. जीवनभर मला तुझी सेवा करायची आहे. जे नवीन जीवन देण्याचे अभिवचन तू मला दिले आहेस ते कसे जगावे हे मला शिकायचे आहे. येशू मी आता तुझा स्वीकार करतो, मी मला स्वतःला तुझ्या हाती सोपवून देतो. मी जसा आहे तसा माझा स्वीकार कर, आणि मी जसे व्हावे असे तुला वाटते तसे मला बनव.*

*येशू, माझे तारण केल्याबद्दल मी तुझे उपकार मानतो. तुझ्या पवित्र आत्म्याने मला भर आणि मला जे शिकायची गरज आहे ते सर्व मला शिकव. माझे तारण झाले आहे, माझा नवीन जन्म झाला आहे, आणि मेल्यानंतर मी स्वर्गात जाईन असा माझा विश्वास आहे. देवपित्या, माझ्या जीवनाचा आनंद मी घेणार आहे, आणि तुझ्या गौरवासाठी जगणार आहे. आमेन!*

# अधिक अभ्यासासाठी

नवीन जीवनात वाढण्यासाठी तुम्हांला उपयुक्त ठरेल असे पुष्कळ साहित्य माझ्याकडे आहे. तुम्ही कॅटलॉग मागवू शकता, आम्ही तो तुम्हांला मोफत पाठवू. तसेच तुम्ही आमचे मासिकही मागवू शकता, तेदेखील तुम्हांला अनेक महिने मोफत पाठवले जाईल.

*युद्धभूमी मनाची* तसेच *हाऊ टू सक्सीड अॅट बिईंग युअरसेल्फ* या माझ्या पुस्तकांची मी जोरदार शिफारस करते. *तसेच वचन, नाव आणि रक्त* हे माझे पुस्तकही तुम्ही अवश्य वाचा. येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर तुमच्यासाठी जे केले त्यासंबंधी आणि त्याच्यावरील विश्वासणारे या नात्याने तुम्हांला जे सामर्थ्य उपलब्ध आहे त्यासंबंधी तुमच्या जीवनात चांगला, मजबूत पाया बांधण्यासाठी या पुस्तकाची तुम्हांला मदत होईल.

*प्रेसिंग इन अॅन्ड प्रेसिंग आॅन* ही एक चांगली शिक्षणमालिका कॅसेट आणि सीडीजवर उपलब्ध आहे, तसेच तुमच्या मुखातील शब्दांचे सामर्थ्य याविषयी शिकवणारी माऊथ ही मालिका उपलब्ध आहे.

तसेच अधिक मदतीसाठी तुम्ही आमच्या कार्यालयाशी संपर्क साधू शकता. देव तुमच्यावर प्रीती करतो तसेच आम्हीही तुमच्यावर प्रीती करतो हे लक्षात ठेवा.

# तारणाची प्रार्थना

देव तुमच्यावर प्रीती करतो आणि त्याला तुमच्यासोबत वैयक्तिक नातेसंबंध हवे आहेत. तुम्ही जर येशू ख्रिस्ताला आपला वैयक्तिक तारणारा म्हणून स्वीकारले नसेल, तर आताच तुम्ही त्याचा स्वीकार करू शकता. त्याच्यासाठी तुमचे अंतःकरण उघडा आणि ही प्रार्थना म्हणा...

"पित्या, मी तुझ्याविरुद्ध पाप केले आहे याची मला जाणीव आहे. कृपा करून मला क्षमा करा. मला शुद्ध कर. तुझा पुत्र येशू ह्याच्यावर विश्वास ठेवण्याचे वचन मी देतो. तो माझ्यासाठी मरण पावला - तो वधस्तंभावर मरण पावला तेव्हा त्याने माझे पाप स्वतःवर घेतले असा माझा विश्वास आहे. तो मेलेल्यांतून उठला असा माझा विश्वास आहे. आता ह्या क्षणी मी माझे जीवन येशूला समर्पण करतो.

पित्या, पापक्षमेची आणि सार्वकालिक जीवनाची देणगी तू मला दिलीस म्हणून मी तुझा/तुझी आभारी आहे. तुझ्यासाठी जगण्यासाठी कृपा करून मला मदत कर. येशूच्या नावात, आमेन."

तुम्ही मनापासून ही प्रार्थना केली म्हणून देवाने तुमचा स्वीकार केला आहे, तुम्हांला शुद्ध केले आहे, आणि आध्यात्मिक मरणाच्या बंधनातून तुम्हांला मुक्त केले आहे. पुढील शास्त्रभाग वाचून त्यावर मनन करण्यासाठी वेळ काढा आणि तुमच्या नवीन जीवनात तुम्ही देवाबरोबर वाटचाल करत असताना त्याने तुमच्याशी बोलावे म्हणून त्याला विनंती करा.

- योहान. 3:16
- 1 करिंथ. 15:3-4
- इफिस. 1:4
- इफिस. 2:8-9

- 1 योहान. 1:9
- 1 योहान. 4:14-15
- 1 योहान. 5:1
- 1 योहान. 5:12-13

ख्रिस्तासोबतच्या नातेसंबंधात तुमची वाढ होण्यासाठी तुम्हांला उत्तेजन मिळावे म्हणून पवित्र शास्त्रावर विश्वास ठेवणाऱ्या चांगली मंडळी (चर्च) तुम्हांला मिळावी म्हणून प्रार्थना करा. देव नेहमी तुमच्यासोबत असेल. तो रोज तुम्हांला मार्गदर्शन करील आणि तुमच्यासाठी त्याच्याकडे असलेले विपुल जीवन कसे जगावे हे तो तुम्हांला दाखवील!

# लेखिकेविषयी

जॉयस मेयर ह्या पवित्र शास्त्राचे व्यवहारोपयगी शिक्षण देणाऱ्या जगप्रसिद्ध शिक्षिका आहेत. एंजॉइंग एव्हरी डे लाईफ हा त्यांचा टीव्ही आणि रेडिओ कार्यक्रम जगभरातील शेकडो टीव्ही नेटवर्क्सवरून आणि रेडिओ केंद्रांवरून प्रक्षेपित केला जातो.

जॉयस ह्यांनी शंभरपेक्षा अधिक प्रेरणादायक पुस्तके लिहिली आहेत. त्यांच्या लोकप्रिय आणि प्रचंड मागणी असलेल्या पुस्तकांमध्ये *गॉड इज नॉट मॅड अट यू; मेकिंग गुड हॅबिट्स, ब्रेकिंग बॅड हॅबिट्स; डु युअरसेल्फ अ फेवर... फरगिव्ह; लिव्हिंग बियॉन्ड युअर फिलींग्ज; पॉवर थॉट्स; बॅटलफील्ड ऑफ द माइंड; लूक ग्रेट, फील ग्रेट; द कॉन्फिडन्ट वुमन; आय डेअर यु; ॲन्ड नेव्हर गिव्ह अप!* ह्या पुस्तकांचा समावेश आहे.

*जॉयस* परिवार वर्षभर विपुल प्रवास करून जगभरातील अधिवेशनांमध्ये हजारो लोकांसमोर संदेश देत असतो.

To contact the author in the United States, please write:
Joyce Meyer Ministries
P.O. Box 655,
Fenton, Missouri 63026
or call: (636) 349-0303
or log on to: www.joycemeyer.org

**Go to tv.joycemeyer.org**
**to watch Joyce's messages in a variety of languages**

To contact the author in India, please write:
Joyce Meyer Ministries
Plot No. 512/B, Road No. 30,
Jubilee Hills, Hyderabad - 500 033
or call: 2300 6777
or log on to: www.jmmindia.org

*आम्हांला लिहीत असताना कृपया तुमची साक्ष किंवा या पुस्तकाद्वारे मिळालेली मदत यांविषयी लिहा. तुमच्या प्रार्थनाविनंत्याही तुम्ही आम्हांला कळवू शकता.*

# तुमचा सार्वकालिक काळ तुम्ही कोठे घालवणार?



पुष्कळ लोकांना केवळ आजची किंवा बहुधा पुढील काही महिन्यांची फिकीर असते. किंवा जास्तीत जास्त 'रिटायर झाल्यानंतर काय' एवढाच प्रश्न त्यांना सतावतो. पण मृत्यूनंतरच्या जीवनाविषयी काय? तुम्ही त्यासाठी तयार आहात का?

एक ना एक दिवस तुमच शरीर मरेल, पण तुमचा आत्मा सर्वकाळ जिवंत राहील. तुमचा आत्मा स्वर्गात राहणार की नरकात हे तुम्ही केलेल्या निवडीवर अवलंबून असेल. तुम्हांला योग्य निर्णय घेण्यास मदत व्हावी म्हणून लोकप्रिय लेखिका जॉयस मेयर यांनी या पुस्तकात देवाची तारणाची योजना स्पष्ट केली आहे.

## या पुस्तकात तुम्हांला पुढील गोष्टी शिकायला मिळतील:

- येशूची कथा आणि त्याचे महत्व.
- विश्वास मनात नव्हे, तर अंतःकरणात कसा उत्पन्न होतो.
- ख्रिस्ताचा स्वीकार करण्यासाठी तुम्ही काय विश्वास ठेवला पाहिजे.
- तुमच्या नवीन जीवनात वाटचाल कशी सुरू करावी.

निर्णय पुढे ढकलू नका. **नवीन जीवनशैलीचा** शोध घेण्याची हीच वेळ आहे!

JOYCE MEYER MINISTRIES®

Plot No. 512/B, Road No. 30,
Jubilee Hills, Hyderabad - 500 033